सं. ठाणे ३४५
सन १८८८
स. रिसबड
९८०
श्री शिवछत्रपती
भाग १ ले

...नेर्भवतिभारत ॥
...त्मानं सृजाम्यहम् ॥
श्रीमद्भगवद्गीता.

के. स. रि. कृत.

पद्यात्मक.

# श्रीशिवछत्रपति.

## पुस्तक भाग १ ला.

किंमत सहा आणे.

( शिवाय डांक खर्च. )

३४५
काव्य

रा॰ रा॰

अरुणोदय पत्रकर्ते मु॰ ठाणें यांचे सेवेशीं॰
हे पुस्तक परामर्शार्थ नजर पाठविलें आहे याचा
स्वीकार होऊन आपला अभिप्राय अरुणोदय
पत्रांत छापून प्रसिद्ध होईल अशी आशा
आहे॰ मु॰ पुणें॰ ता॰

[illegible] पुस्तककर्ता के॰ ल॰ रि॰

सं.का.ॅप
८४

# श्रीशिवछत्रपति.

## भाग पहिला.

हें पद्यात्मक पुस्तक,

केशव सदाशिव रिसबूड, पेन्शनर मास्तर
मुक्काम धुळें जिल्हा खानदेश

ह्यांनीं तयार केलेलें.

धुळें येथें,

विठ्ठल लक्ष्मण उपासनी यांच्या

“ आर्यावर्त ” छापखान्यांत छापिलें.

चैत्र मास शके १८१९ हेमलंबीनाम संवत्सर.

माहे एप्रिल सन १८९७ इसवी.

( या पुस्तकावर, सन १८६७ चा आक्ट २५ अन्वयें रजिष्टर करून पुस्तककर्त्यानें आपला सर्व हक्क ठेविला आहे. )

किंमत सहा आणे.

## आर्या.

श्रीशिवछत्रपतिनृपति साक्षादवतार होय शंभूचा ॥
उतराया भार, हरुनि दुर्जनमद, करुनि साधुशं, भूचा ॥

---

१ सज्जनांचें कल्याण.

# श्रीशिवछत्रपति पुस्तकाची प्रस्तावना.

ह्या आपल्या सर्व भरतखंडावर बलवत्तर यावनी-राजसत्ता चहूंकडे सारखी फैलावून जोरावल्यामुळें आपण सर्व हिंदुलोक ज्या काळीं केवळ श्ववृत्तीनें मुसलमानांचे बंदे गुलाम बनलों; एका हातांत कुराण आणि दुसऱ्या हातांत तीक्ष्ण तलवार, अशा प्रकारच्या जुलमी व एककल्ली महंमदीधर्माचें सर्वत्र प्राबल्य वाढत गेल्यामुळें हिंदूंच्या सनातनभारतधर्माची पायमल्ली होत्साता ज्या काळीं मुसलमानांच्या सुंतांचा सुळसुळाट होऊन, हिंदूंच्या शेंड्यांची कत्तल उडून, जिकडेतिकडे दाढ्या रोंकाळल्या; हिंदूंचीं वेदशास्त्रपुराणें तळघरांतून जागच्याजागीं आच्छादित राहून, ज्या काळीं महंमदीकुराण चित्रविचित्र मौल्यवान रेहलेवरून[1] राजरोषपणें ठिकठिकाणीं विलसलें जाऊन ध्वनित होऊं लागलें; हिंदूंचे पूज्यमान् देव व देवालयें आणि तशींच मठादि पवित्रस्थानें मुसलमानांच्या हल्ल्यांतील तडाख्यानें छिन्नभिन्नता व उद्ध्वस्तता पावून त्या त्या स्थळीं ज्या काळीं भव्य व दिव्य अशा मशीदींचे तेजोमय घुमट चमकूं लागून उच्च मनोरे डोल घेऊं लागले; देवालयांतून व मठादिकांतून हरिकीर्तननामघोष मुसलमानांच्या धास्तीनें सर्वत्र स्तब्धता पावून ज्या काळीं मशीदी व दर्ग्यांतून वेळोवेळीं निमाजाच्या कर्कश किंकाळ्यांनीं गांवांतील सर्व महल्ले दणाणूं लागले; हिंदूंच्या

---

१ किताब ठेवण्याची बैठक.

पवित्र व पूज्य धेनुमातांचा त्यांच्या देखत वध करून त्या धेनुमांसानें भरलेल्या पाट्या ज्या काळीं ब्राह्मणांच्या डोकीवर देऊन गांवांतून हिंडवून त्यांच्या त्या विटंबनेनें मुसलमानलोक हर्षभरित होत्साता खिदळूं लागले; हिंदूंच्या प्रसिद्ध देवादिकांच्या यात्रा अजनी बंद पडून ज्या काळीं जिकडेतिकडे पिरांचे उरूस नांवाजूं लागले.

अशा त्या घोरतर, पापरूपी, दुर्धर व दुःसह अविंधमय काळांत, स्वत्राणार्थ कोणाकडे धांव घेण्यासारखाही कोणी समर्थवीर त्राता न उरल्यामुळें, 'त्राहिभगवान्' होऊन हा आपला सारा आर्यावर्तदेश मुसलमानांकडून होत असलेल्या नाना दुःसह हालअपेष्टांच्या दुःखवेदना सोशीत निर्वीरता पावून सर्वपरी निस्तेजता पावला असतां, जो एका सोमवंशीय यवनांकित छोट्याशा जाहगीरदाराच्या पोटीं ह्या भूतलावर अवतीर्ण झाला; केवळ पांच वर्षांच्या वयांतच ज्याच्या अंगभूत असलेले क्षात्रकुलोचित " शौर्यंतेजो धृतिर्दाक्ष्यं । युद्धेचाप्यपलायनम् ॥ दानमीश्वरभावश्च । क्षात्रंकर्मस्वभावजम् " ॥ १ ॥ हे नैसर्गिक सात गुण लोकांच्या प्रत्ययास ढळढळीत येऊंलागले; महंमदी जुलमी धर्माचा सर्वत्र प्रसार, ब्राह्मणांचा छळ आणि गोवधादिकरून आंगास शाहारे आणणाऱ्यां हिंदुधर्मभ्रष्टतेच्या दुष्कृत्यांनीं ज्याच्या तळचो आग मस्तकीं जाऊन केवळ सहा वर्षांच्या वयापासूनच जो त्वेषास चढून मुसलमानांचा द्वेष करूं लागला; सात वर्षांचा बाळ असतांही ज्यानें विजापूरच्या बादशाही भरदरबारांत प्रत्यक्ष भेटींत बादशहास दरबारच्या रिवाजाप्रमाणें सलाम किंवा मुजरा कांहींएक न करितां वीरासन घालून मोठ्या

ऐटींत बसला; व पुढें प्रत्यक्ष बाप उपदेश करून वारंवार सांगत असतांही ज्यानें " मी यावज्जीव शिखानष्टांस सलाम करणार नाहीं, आणि त्यांच्या ताबेदारीवर उपजीवन न करितां स्वतःच्या पराक्रमावर स्वतंत्र भाकरी कमवून खाइन " असें आवेशयुक्त बोलून त्यास निरुत्तर केलें; पुढें वयाच्या दहाव्या वर्षापासून जो आपल्या जाहगिरीचे कारभारी दादोजीकोंडदेव यांच्या दक्षतेखालीं पुणें येथें वास्तव्य करून राहिला, इतकेंच नव्हे तर ज्यानें आपल्या जाहगिरीच्या मुलुखांतील स्थितीनें गरीब, परंतु जात्या परमविश्वासु, शूर, आणि प्रसंगीं आपल्या धन्यासाठीं जीवास जीव देणारे असे सर्व हेटकरी व मावळे लोक आपलेसे करून घेऊन, धोरण बांधून त्यांच्या साह्यानें वयाच्या सोळाव्या वर्षी ज्यानें आदिलशाहींतील मोठ्या बंदोबस्ताचा तोरणा किल्ला सर करून घेऊन, त्यावर हिंदुपदपादशाहीचा प्रथमचा झेंडा फडकविला; ह्या भूतलावर ज्याच्या प्रचंड प्रतापरूप चंडांशूची उत्तरोत्तर जसजशी दीप्ति फांकत चालली, तसतशी सर्व अविंधभणांस निस्तेजता प्राप्त होत गेली; जो दुष्टांस केवळ कृरदनकाळ होऊन, सुष्टजनांस कल्पवृक्षासारखा झाला; ज्यानें स्वबाहुपराक्रमानें मुसलमान लोकांस ' दे माय-धरणी ठाय ' करून सर्वतोपरी हिंदूंच्या नष्ट झालेल्या राजसत्तेची या सर्व महाराष्ट्र देशांत पुनः संस्थापना करून, ज्यानें ग्लान झालेल्या हिंदूंच्या सनातनभारतधर्माचें पुनरुज्जीवन केलें; आणि ज्याच्या पुण्यप्रतापेंकरूनच आजपर्यंत हिंदूंचें हिंदुत्व कायम राहून, ज्याचे खरोखर आपण सर्व हिंदुलोक मोठे ऋणी आहोंत. अशा त्या स्व-

स्वाभिमानी, पुण्यश्लोक, भाग्यशाली, महाप्रतापी राजाधिराज श्रीशिवछत्रपति महाराजांचा प्रतिवार्षिक सार्वजनिक जयंत्युत्सव (रामकृष्णाप्रमाणें) सुरू करण्याची चळवळ कांहीं दिवसांपूर्वी लोकांत उत्पन्न होऊन, आतां तर तो श्रीशिवजयंत्युत्सव सर्व महाराष्ट्र देशांत ठिकठिकाणीं चालू झाला आहे; परंतु त्या उत्सवांतून व एरव्हींही वेळोवेळीं शिवरायांच्या गुणकर्तृत्वपराक्रमयशोमहिम्याचें कीर्तन व गायन करण्यास साधनभूत अशा खऱ्या ऐतिहासिक पद्यचरित्र पुस्तकाची फारच उणीव दिसून आल्यामुळें आह्मी त्या कथानायकाचीं—मूळपीठिका, जन्मचरित्र, बालक्रीडा, अल्प वयांतील गुणकर्तृत्वपराक्रम आणि राजगुरू दादोजी कोंडदेव यांचा उपदेश अशीं नाना छंदयुक्त पांच कथानकें (बडोदें येथें नुकत्याच छापून प्रसिद्ध झालेल्या 'शिवदिग्विजय'—बखररूप पुस्तकाच्या व महाडचे हर्डीकरकृत 'शिवविजय' नामक पोथीच्या आधारें) कीर्तनसरणीपर रचून, हें 'शिवछत्रपति' नामक पुस्तक तयार केलें आहे.

हें पुस्तक कीर्तन करणारे कथेकऱ्यांस तर फारच उपयुक्त होणारें असून, शाळांतील विद्यार्थीवर्गास व अवांतर सर्व समंजस लोकांसही संग्रहार्ह होईल, अशी खात्री वाटत आहे. तरी ह्या पुस्तकास सर्व लोक आपला उदार आश्रय देऊन पुस्तककर्त्याच्या श्रमाचें साफल्य करतील, तर ह्या 'शिवछत्रपति' पुस्तकाचा पुढील दुसरा भाग छापून प्रसिद्ध करण्यास त्यास उमेद येईल.

के. स. दी.

पुस्तककर्ता.

. कार्थ
१०
कोट२१
२७०९

# श्रीशिवछत्रपति.

## श्लोक.

श्रीकृष्णोक्ति.

॥ "परित्राणायसाधूनाम्। विनाशायचदुष्कृताम् ॥
॥ धर्मसंस्थापनार्थाय । संभवामियुगेयुगे" ॥ १ ॥

श्रीमद्भगवद्गीता.

## कथानक पहिलें.

### श्रीशिवछत्रपतींची मूळपीठिका.

### विषयानुक्रम.

[ श्रीशिवरायाचें मूळचें घराणें, कुळ व वंश कोणकोणते असून कोणता मूळपुरुष या देशीं येऊन कोठें वस्तीस राहिला; व तदनंतर त्याच्या वंशांत शिवछत्रपतीचा पणजा, आजा व बाप हे कोण कोण पुरुष झाले ते; आणि शिवरायाचा पिता जो शहाजी आणि माता जिजाबाई ह्या उभयतांच्या लग्नाचा आश्चर्यकारक वृत्तांत. ]

## आर्या.

मेवाड-उदेपुरच्या राण्यांचें शुद्धकुल शिसोदें, तें ॥
तज्जन[1]-चरितकथनीं सतत बहूत्सव मना असो देतें ॥१॥
काकाजि भोंसले त्या राजकुलांतील थोर धनवाले ॥
ग्रहकलहभयें सस्त्री या देशीं प्रथम उज्जनिस आले ॥२॥
त्यांनां स्थळींस्थळींच्या पाटिलक्या विकत घेउनी मोलें ॥
ह्मणवुनि जमीनदारचि निजामशाहींत वागती तोलें ॥ ३ ॥

## साक्या.

ग्रामवेरुळीं नगरदौलताबाद-बादशाहींत ॥
नांदुं लागतां त्या प्रांतीं ते झाले बहु माहीत ॥ ४ ॥
जाणें येणें बादशहाच्या सतत घडुनि दरबारीं ॥
काकाजीची बहुत वाढली मानमरातब सारी ॥ ५ ॥
तद्वंशीं बाबजी भोंसले प्रकाशले नरमणि जे ॥
तेच आपल्या चरित्रनायकशिवरायाचे पणजे ॥ ६ ॥

## फटका.

प्रपितामहही पितामह पिता शिवरायाचे जे कैकां ।
नाहित ठावे, क्रमेंकरुनि ते कथितों श्रोतेहो ऐका ॥ ध्रु०॥
सुप्रसिद्ध बाबजी भोंसले शिवरायाचे जे पणजे ।
पुत्र दोन त्यां, एक विठोजी, मालोजी दुसरा साजे ॥

---

१ शिसोदें कुलोत्पन्नपुरुषाच्या चरित्रकथनाचे ठायीं.

निजामशाहीच्या दरबारीं कनिष्ठ-मालोजीराजे ।
स्वगुणें विख्यातीस पावले, तेचि शिवाजीचे आजे ॥
अवलीयाच्या कृपाप्रसादें द्विपुत्र मालोजीला जे ।
झाले, त्यांतिल ज्येष्ठ शहाजी, त्या पाहुनि मन्मथ लाजे ॥
बहु धनाढ्य सरदारबहादुर जाधवराव लखोजी[1] जे ।
तदाश्रयें उदयास येउनी मालोजीचें यश गाजे ॥

चाल.

जिजाबाइ जाधवदुहिता ॥
रूपें केवळ कनकलता ॥
होय शहाजीची वनिता ॥

ब्रह्मसूत्रदृढबंधन घडलें कैसें त्या एकांमेकां ।
चमत्कार तो श्राव्य ह्मणुनि मी श्रुत करितों अवघ्यां लोकां
॥ १ ॥ प्रपितामहही पितामह० ॥ ध्रु० ॥ ७ ॥

## रंगपंचमीचा सण.

कटाव.

होणाऱ्या अवघ्या गोष्टी । आपाप घडुनि येतात । हें निभ्रांत ॥ ध्रु० ॥ नगरदौलताबादभीतरीं । रंगपंचमिस तिसऱ्याप्रहरीं । बसले जाधवराव आपल्या दिव्यमंदिरीं । तत्सन्निध चतुर सप्तवर्षात्मिका तयाची । जिजाबाइ कन्यका

---

१ लुखजी जाधवराव.

शोभली रूपसुंदरी । पुढें गुलालभरीतरौप्यतबकपात्र वि-
लसुनि, । त्या शेजारीं केशरि-सुरंगयुक्तरौप्यबहुगुणेंपात्र
तें । तन्मध्यंतारिं सोनेरी खुलतसे हजारी । सभोंतारच्या
दिव्य मृदु बिछायती वरुनि बैसली मंडळी । भेटीला आ-
लेली सारी । अशा अवसरीं पुत्र शहाजी-समवेत तिथें
आली मालोजिची स्वारी । जाधवराव तयास आदरुनि ।
बसवी आपुलिया सामोरी । कुमर शहाजी । लावण्येंअतिसुं-
दर केवळ सुढाळ निर्मळ दाणा सूर्ती । ऐशी दशवर्षात्मिक
मूर्ती । येउनि अवलोकनांत पूर्ती । तत्कालीं जाधवरावाचें
मन मोहुनि, जडलें त्यावर्ती । बाळा, ये इकडे मजऔर्ती ।
ऐसें बाहुनि । हातहि देउनि । त्यास आपल्या बसवी स-
न्निध उजव्या हातीं । वामहस्तकीं । जिजाकन्यका विल-
सत होती । उभय अशीं तीं मुलगामुलगी । करुनी सलगी ।
अन्योन्यावरि रंग उडवुनी । गुलाल अंगावरी उधळिती ।
ही अवलोकुनि चमत्कृती सर्व लोक ह्मणती । रति-मन्म-
थसम संप्रति हीं वधुवरें शोभती । नकळे प्रभुची अतर्क्य-
चि कृती । याच अवसरीं । प्रेमानंदें । सहज विनोदें ।
जाधव बोले । अहो मालुजीराव, तुह्मी आमचे जहालां
व्याही आजी ॥ त्यासरसाच उठुनि मालोजी । बोलेच
उभारुनि हात ॥१॥ होणाऱ्या अवध्या गोष्टी०॥ध्रु०॥८॥

१ अनेक छिद्रांची पिचकारी. २ माझ्याजवळ.

मराठी २३७५

श्लोक.

व्याही आपण बोललांत मजला ही आपली वैखरी ।
चित्तीं संतत वागवूनि समयीं लोकीं करावी खरी ॥
ऐसें बोलुनि, जाधवास पुसुनी मालोजि जातां गृहीं ।
चित्तीं विस्मित होउनी सकल ते गेले घरां लोकही ॥ ९ ।

एके दिनीं उपरि, जाधव मालुजीला ।
पाचारितां करुनि आग्रह भोजनाला ॥
येरू ह्मणे, प्रथम आपण एकमेक ।
व्याही बनूनि करुं भोजन, हेंचि ठीक ॥ १० ॥
मालोजिला वदत जाधव सोपचार ।
हा भोजनोत्तर करूं अवघा विचार ॥
येरू ह्मणे मज दिल्यीं वचना स्मरून ।
व्याही ह्मणा उपरि भोजन मी करीन ॥ ११ ॥
ही व्हावया जाणिवे अंगनेला ।
तो स्वाश्रमीं जाधवराव गेला ॥
मोठेपणाची धरुनी अहंता ।
क्रोधें वदे जाधवरावकांता ॥ १२ ॥

## जाधवपत्नीची गर्वोक्ति.

छंद.

अनुलक्षुनि मालोजीस हिमायॅतवाली ।

१ दिलेल्या. २ गोष्ट कळविण्याला. ३ संपत्तीचा तोरा बाळगणारी

ती जाधवपत्नी पतिस बोलती झाली ॥ धृ० ॥
ज्याचिया धडहि नच मिळे वस्त्र ढुंगाला ।
करुं ह्मणतां व्याही तुह्मी त्याच कंगाला ॥
समतोलपणा जरि असे दोन्हि अंगाला ।
तींच हो वधुवरें योग्य सुहृत्संगाला ॥
हिरकणिची येइल काय दीप्ति भिंगाला? ।
कस्तुरिचें येइल मोल कसें हिंगाला? ॥
कळविणें स्पष्ट नाकार त्यास ह्याकालीं ।
केसरिची कैसी महति जंबुका आली! ॥
अनुलक्षुनि मालोजीस० ॥ धृ० ॥ १३ ॥

## मालोजीची प्रतिज्ञा.

### ओव्या.

जाधवपत्नीची गर्वोक्ती । ऐकोनि मालोजी खोंचला चित्तीं । आवेशें करी प्रतिज्ञा, ती । सांगतों श्रोतीं ऐकावी ॥ १४ ॥ हीच कन्यका माझी स्नुषा । साधूनि भूषवीन भोंसलेवंशा । ही माझी भागवाया तृषा । एक जगदंबा समर्थ ॥ १५ ॥

### पद.

चाल ( एडका-मदन )

वदे तत्कालीं । मज्जननि तरिच मज व्याली ॥ धृ० ॥
निज दौलतिच्या मोठ्या तोलें ॥

हिणवुनि मजला देउनि टोले ॥
जाधवपत्नी दुर्वच बोले ॥
हरवुनी गर्व हा तिला पाहाविन खालीं ॥ मज्ज० ॥ १ ॥
मन जडलें ह्या कन्यारत्नीं ॥
तेंच साधुनी हर प्रयत्नीं ॥
पदीं लोटविन जाधवपत्नी ॥
करिल ती साह्य[१] मज खचित अंबिकावाली ॥ म० ॥ २ ॥ १६ ॥

## देवीचें अनुष्ठान व प्रसन्नता.

श्लोक.

शुचित्वें मालोजी स्थिर बसुनि एकांतभुवनीं ॥
कुलश्रीदेवीतें नमुनि, दृढ संस्थापुनि मनीं ॥
धनेच्छानुष्ठान त्रिदिन करुनी निश्चलमनें ॥
तदंतीं मालोजी भगवतिस संप्रार्थुनि ह्मणे ॥ १७ ॥

पद. चाल—( दैवयोग दुर्विपाक. )

धांव पाव आदिमाय मम कुलांबिके ॥
पाहसी मदंत काय अजुनि कौतुकें ? ॥ ध्रु० ॥
निर्धनता लौकिकांत मानखोलवी[२] ॥
कितिकवेळ खालतीहि मान घालवी ॥
बलविक्रमशौर्यधैर्य कांति मालवी ॥
सत्य सांडवूनि, नित्य अनृत बोलवी ॥

---

१ साहकारी. २ सन्मान कमी करिते.

ही माझी लाज तुला दीनपालके ॥ १ ॥
धांव पाव आदिमाय. ॥ ध्रु० ॥ १८ ॥

### श्लोक.

तदा स्वप्नीं देवी प्रकटुनि वदे, " मालुजि तुला ॥
प्रसन्ना मी झालें बघुनि तव बा भक्ति अतुला ॥
तुझ्या क्षेत्रप्रांतातिल निमुट वारूळ खण गा ॥
असंख्यद्रव्याचा क्षणिच तुज लाभेल कुणंगा " ॥ १९ ॥
" उठें लागें कार्या तव उपरि या होइल शिवें ॥
तुझ्या बा सद्वंशीं झट अवतरेल प्रभुशिव ॥
स्वराज्य स्थापील स्वरिपुयवना मर्दुनि गड्या ॥
पुढें तें चालेल क्रम धरुनि सत्ताविस पिढ्या " ॥ २० ॥

## द्रव्यलाभ व त्याचा व्यय.

### कटाव.

भाग्यकाळघटिका येतां । रंकाचा होइल राय । नवल-चि काय ? ॥ ध्रु० ॥ अधीच मालोजी धैर्याचा । शुद्ध हिमाचळ । वागणुकीचा । पवित्र निर्मळ । वाचेचा सोम-ळहि मनाचा । बहु कोमळ, बुद्धि निश्चयाचा । अढळ, श्रीशिवभक्त प्रेमळ । शुद्धबुद्ध धर्मात्मा केवळ । जातीचा धौताल तसा हातचा उदारहि । तशांतुनी श्रीदेवीची अ-निवार कृपा होउनी तयावर । भूम्याच्छादित । गुप्त अ-

१ शेताच्या आवारांतील. २ ठेवा. ३ कल्याण.

पार द्रव्यनिधी लाभतां अवचिता । पुसतां काय कशाला? त्याच्या । सीमा न उरे दातृत्वाला । करुनि नित्य दानधर्म सगळ्यां । अनाथ दुबळ्यां संतुष्ट करी । इच्छा पुरवुनि वेगवेगळ्या । दूरदूरच्या रहदारीच्या । निर्जळस्थळीं । कूप वापिका बांधूनि तळीं । पांथस्थांची तृषा हरुनि, शांति दे त्रिकाळीं । ठिकठिकाणच्या सुप्रसिद्धशा देवदेवळीं । नैवेद्यांसह अखंड नंदादीप उज्वळी । कितिक गोपुरें । ईश मंदिरें । जीर्णोद्धारें । सुधरूनि करी दुरस्त खाशीं । नूतन देवालयें कितिक बांधिलीं सुंदरें । कितिक धर्मशाळाहि मुशाफरखाने बहु सोयिचे उभारी । मार्गीं मार्गीं । सदां खुलीं ऐशीच सदावर्तेंहि अन्नसत्रें संस्थापुनि । पांथस्थांची क्षुधा निवारी ॥ परोपकारी सतत सुजन तो । झिजवी निजधनमनकाय ॥ भाग्यकाळ० ॥ १ ॥ २१ ॥

## ओव्या.

भरत असलेल्या प्रतिचैत्रीं । श्रीशंभुमहादेवाच्या यात्रीं ॥ पाण्याचा खडखडाट नेत्रीं । पाहुनी मालोजी काय करी? ॥२२॥ वेंचूनि द्रव्य अपरमित । तेथें बांधी तडाग विस्तृत । त्यास लागूनि झरे जीवंत । पाणी खेळत राहिलें ॥ २३ ॥ पाण्याचें दुर्भिक्ष्य मोडून । यात्रेकरी पावती समाधान । मालोजीस दुवा देऊन । जाती परतून निज ठायीं ॥ २४ ॥ उपरी श्रीशंभुमहादेवीं । महारुद्राभिषेक

करवी । बांधून महापूजा बरवी । विप्रां गौरवी धनवसनीं ॥ २५ ॥ शेवटील होतां संतर्पण । संतुष्टूनि ब्राह्मण गण । मालोजीस देई आशीर्वचन । होवो कल्याण चिर तुझें ॥२६॥

पद. चाल—( उद्धवा शांतवन करजा. )

मालुजिच्या येउनि स्वप्नीं । शिवदेव वदे परिसातें ॥ध्रु०॥
पाहुनी तुझी दृढ भक्ती । सुप्रसन्न झालों तुजला ॥
धन नित्य अमित तव कोशीं । वर्षुनि जगिं जाशिल पुजिला ॥
यश कीर्ति पावाशिल लोकीं । ऊठ जा लाग कार्याला ॥
त्वत्सुपेत्रिया पुण्यकुशीं । जन्मुनि मी सुखविन अचला ॥

चाल.

मर्दुनी शिलानष्टांसीं ।
स्थापिन स्वराज्या देशीं ।
तोषवीन निज रयतेसीं ।
उज्वलीन निज धर्मातें ॥ १ ॥ मालुजिच्या. ॥ २७ ॥

## मालोजीची गुणकर्तृत्वख्याती.

आर्या.

दाता धर्मात्मा बहु मालोजीसम न अन्य, ना शंका ॥
शिवभक्त शूर वीरहि ऐसा सर्वत्र गाजला डंका ॥ २८ ॥
धनवसनान्नजलस्थळ यांहीं जो होय सौख्यसंगाती ॥
पावूनि शांतितुष्टिहि जन तद्गुणकीर्तिधन्यता गाती ॥२९॥

---

१ खजिन्यांत. २ पृथ्वी.

रा.आ.



## मालोजीस निजामशहाची देणगी.

### साक्या.

यश परिसुनि हें मालोजीवर मर्जी जडुनि शहाची ॥
मद्राज्यांत ह्मणे धर्मात्मा शूर वीर नर हाची ॥ ३० ॥
पांच हजार स्वारांची त्या देउनि मनसबदारी ॥
शिवनेरीचाकणकिल्ल्यांची पूर्ण दिली मुखत्यारी ॥ ३१ ॥
चालाया खर्च, सरमजामी मुलुखकैक लाखांचा ॥
तोडुनि दिधला दुर्गकोटसह अठ्ठावीस सुभ्यांचा ॥ ३२ ॥
पुणें, सुपें ह्या दों प्रांतांची दिधली जाहागीर ॥
'राजा' ऐसा किताब देउनि जनीं ह्मणविला थोर॥३३॥

### श्लोक.

सद्भाग्यें वरिला, जनांत सकलां जो जाय वाखाणिला ।
शाहें गौरविला, पदास चढला, संपत्तिनें वेष्टिला ॥
राजा बोलविला, जगांत पटला सन्मान्यता पावला ।
धर्मात्मा म्हटला, यशें विनटला सर्वत्र झाला भला ॥३४॥

## जाधवपत्नीचा खेद व तिचें शांतवन.

**पद.** चाल–( शंकरजी मै बाल तुमारो. )

पतिस जाधवी खेदें बोले दौलतिची दावुनि गुर्मी ।
मालुजीस म्यां व्यर्थ दुखविलें दुरुक्तिशर ताडुनि मर्मी ॥ ध्रु०
हिरमुसुनी मालोजी गेला दुरुक्ति माझी परिसून ।
ही मत्कन्या आतां त्याची व्हावी कैशी तरि सून ॥

कंकर समजुनि, झोंकूनि दिला शंकर हातीं गवसून ।
जाय निघुनि जो वाग्ध्वनि, येइल परत काय तो नवसून ? ॥
भलतिच इच्छा केली छायीं कल्पतरूच्या बैसून ।
भूल कशी हीं मजला पडली सर्व यथास्थीत असून ॥
धनांध होउनि उन्मत्तपणें केवळ गेलेंचि फसून ।
अनुतापें वाटेचि मरावें कट्यार पोटीं खुपसून ॥
अभागिला मज लोटूनि दिलें दुर्दैवें या दुष्कर्मीं ।
मालुजीस म्यां व्यर्थ दुखविलें दुरुक्तिशर० ॥ १ ॥
गतगोष्टीचा नुस्ता खेदचि करूनि अल्पहि फळ नाहीं ।
हेतुकार्यसिद्ध्यर्थ विचारें तोड यास काढा कांहीं ॥
हरप्रयत्नें वश मालोजी तुह्मी करा वा करवाही ।
देउनि मुलगी करुनी सलगी त्यास जगीं बोला व्याही ॥
हिच्या रूपसद्गुणानुरूपच योग्य शहाजी जांवाई ।
लग्नयोग हा जुळवूनि करा तिथिनिश्चय बहु लवलाहीं ॥
लग्नाची वाजवाच टाळी तिथिस शुक्लपंचमि माही ।
सर्व ज्ञातिस भोजन देउनि तुष्ट करा अवघ्या[1] शोही ॥
केसरि सांगे दीनजनां बहु सुखवा धन वेंचुनिधर्मीं ।
मालुजीस म्यां व्यर्थ दुखविलें दुरुक्तिशर ताडुनि मर्मीं ॥
॥ २ ॥ पतिसजाधवी ॥ ध्रु० ॥ ३९ ॥

## दिंड्या.

ह्मणे जाधव, गे प्रिये नयन पूस ।

---

१ दौलताबादेंतील सर्व लोक.

करुनि खेद नको कष्टवूं वपूस ॥
देव साह्य तरी तुझे सकल हेतू ।
पूर्ण होतिल, हें समज निश्चयें तूं ॥ ३६ ॥
पणहि मालुजिचा स्वानुकूल पाहीं ।
"स्नुषा करिनच मी जाधवात्मजा ही" ॥
मात्र जाण्याचा त्याकडे उशीर ।
तोंच लग्नाचा भरिल तो रुकार ॥ ३७ ॥

## लग्नाची जुळवाजुळव व लग्न कार्य सिद्धी

### अभंग.

जाऊनि जाधव मालोजीच्या घरीं। दृढ पाय धरी नम्रपणें ॥ मागें झालें त्याचा टाकूनी आठव । पायीं द्यावा ठाव आतां मज ॥ मंदधी मत्कांता बोले बोलूं नेजें । थोरीं तीं पाहिजे क्षमा केली ॥ एकमेक झालों आपण हो व्याही । दावा नवलाई सर्वत्रां हो ॥ ३८ ॥

### श्लोक.

मालोजीला विनवुनि असें होउनी निर्विकार ।
सारा इच्छेसम मिळवुनी घेतलासे रुकार ॥
देणें घेणें ठरुनि अवघें योग्य जें जें विवाहीं ।
दोहीपक्षांकाडिल उपरी होतसे सिद्धताही ॥ ३९ ॥

### आर्या.

रतिवल्लावण्यवती देउनि निजकन्यका जिजाबाई ॥

जाधवरावें स्मरसा शाहाजी जोडिलाच जांवाई ॥ ४० ॥
मग लग्नसोहळा तो सोळा दिन चाललाचि समतोलें ॥
बहु शांति तुष्टि पुष्टिहि पावुनि जो तो मनांत जन डोले ४१

समाप्त.

# कथानक दुसरें.

## श्रीशिवजन्मचरित्र.

### विषयानुक्रम.

( १ निजामशाहीदरबारांत शहाजींचें वर्चस्व वाढत चालल्यामुळें त्याच्या विरुद्ध, मंडळीचा कट. २ विरुद्ध-पक्षाँच कारस्थान उमगून येऊन शहाजींनें केलेला विचार. ३ सौभाग्यवती जिजाबाईची प्रसूतीस्तव शिवनेरीकिल्ल्या-

वर पाठवणी व शहाजीचें-दौलताबादेहून विजापुरास जाणें. ४ दादोजीकोंडदेवाच्या सुव्यवस्थेखालीं जिजाबाईचें शिवनेरीवर वास्तव्य. ५ जिजाबाईचे डोहळे. ६ शिवाजीमहाराजांचें जन्म. ७ पुत्रोत्सव, जातकर्म व नामकर्म. ८ पुत्रोत्सवाबद्दल विजापुरास शहाजीराजे यांस पाठविलेलें पत्र. )

## शहाजीच्या विरुद्ध कट.

### आर्या.

वर्चस्व शहाजीचें-निजामशाहींत वाढतां भारी ।
धरुनि असूया करिती गुजमसलत राजमंडळी सारी॥१॥
'करुनीच शहाजीचा हरगोष्टिंत सर्वथैव हिरमोड ।
त्यावर घोपरड अशी आणूं कीं तो न दाखविल तोंड' २

## शहाजीचा विचार.

### ओव्या.

हें मंडळीचें कपटद्यूत । शहाजीला उमगून येत । ह्मणे आतां राहणें येथ । निव्वळ खचित धोक्याचें ॥ ३ ॥ जो माझा कळकळीचा आसरा । तोच जाधवराव सख्खा सासरा । या कटाचा उत्पादक खरा । बोल इतरां काय द्यावूं? ॥ माझ्या साठींच एवढा । सर्वत्र माजला बखेडा ।

तरी मी विश्वासूनि वेडा । तयावरी बैसलों ॥ विजापुरीं यावयांकारण । आदिलशाहाचें पाचारण । तरी तेथें निघून जाणें आपण । शहाणपण यावेळीं ॥ ६ ॥

## आर्या.

या समयीं तो पहिला संभाजी पुत्र चार वर्षांचा ।
होता शहाजिचा बहु जो जीवप्राण कंद हर्षाचा ॥ ७ ॥
होती तइं गर्भवती प्रिया जिजाबाइ सप्तमासयुता ।
तिज या विपत्प्रसंगीं बोले न्यावी कशी सवें आतां? ॥८
माहेरीं ठेवावी जरि, तरि माहेर तेंच निज वैरी ।
यास्तव दिसे प्रसूतीस्तव निर्भय एक दुर्गशिवनेरी ॥ ९ ॥

## श्लोक.

शाहाणा राजकार्यप्रविण मसलती दूरदर्शी विचारी ।
मायाळू, स्वामिभक्त, प्रियऋतवचनी जो सुपंथाविहारी ॥
दादोजीकोंडदेव प्रिय पुरुष असा धोरणी थोर भारी ।
साऱ्या स्वप्रांतकिल्यावरिल, चतुर जो नेकिचा कारभारी॥१०
त्याच्या ठेवुनि दक्षतेंत सुदती ही आपली कामिनी ।
जावें शीघ्र विजापुरीं मग नको कांहींच चिंता मनीं ॥
ऐसा पूर्ण विचार होउनि मनीं शाहाजिचा तेधवां ।
लागे त्याच तयारिला झडकरी चिंतूनी त्या श्रीशिवा ॥ १२

१ यावयाकारितां. २ प्रिय आणि खरें बोलणारा.

# सौ० जिजाबाईची शिवनेरीवर स्वानगी.

## कटाव.

त्या जिजाबाइची स्वारी । जावया दुर्गशिवनेरी । होय तयारी ॥ ध्रु० ॥ बाळकृष्णहणमंते ते मुजुमदार मोठे । चतुर हुशारहि । खानगिचे शंकराजिनीळकंठ जामदार । रघूनाथबल्लाळ परम विश्वासुक सल्लामसलतगार । तसे किति अन्यकामगार । खजिन्याचे पाहरेकरी कडक अरबलोक । तैनांतितिल स्वार शिबंदी । हत्यारबंदी । अक्षयिचे नजरेंतिल हुजरे । तैसे दुसरे अनेक सेवक । दासी परिचारिका कुणबिणी । किति मैत्रिणी । दाया सुइणी बहुत सुग्रणी । घड्याळची किति । भालदार चोपदार बंदीजन निज-कवनीं । भाट बहुगुणी । कुलविप्रोपाध्याय पुजारी । शास्त्री आणि पुराणिक तैसे । ब्राह्मण शतशतींचे पाठक । नित्यानुष्ठानिक किति वैदिक । गणक राजवैद्य जे अवश्यक । नाना वहनांसह तद्वाहक । मुदपाकाकडिल सर्व लोक । अशा प्रकारी । स्वारीची तातडिनें सारी । करुनि तयारी । बुधानुराधा अमृतसिद्धियोग ह्या अवसरीं । गर्गाचार्यांच्या सुमुहूर्तावरी सत्वरीं । विघ्नहरण शुभ मंगल करण । श्रीगणपतिमंगलमूर्तीचें । करुनिस्मरण अधी, मग चिंतुनि । शुभसुखकर चरण अंबिकेचे । शहाजिनें मग जिजाबाइला । निजहस्तें म्यान्यांत बसवुनी । तन्मुख-

कमला । विलोकुनी भृंगरूपनयनीं । बहु गहिंवरुनी नि-
रोप घेउनि । स्वारीची मग रवानगी देतसे करूनी । मनीं
शहाजी होउनि कष्टी । उलटला परत माघारीं ॥ १ ॥
त्या जिजाबाईची स्वारी० ॥ धृ० ॥ १२ ॥

## शहाजीचें विजापुरास जाणें.

### आर्या.

इकडे निरोप घेउनि राणीचा, चिंतुनी स्वकुल देवी ।
शाहाजी, संभाजीसुतसह बाहेर सव्यपद ठेवी ॥ १३ ॥
नारोपंतहणमते यांसह सोडूनि दौलताबाद ।
धरि पंथ विजापुरचा स्थिर ठेवुनि चित्तवृत्ति सानंद॥१४॥

## जिजाबाईचें शिवनेरीवर वास्तव्य.

### दिंड्या.

स्नानपूजा उरकूनि नित्य कर्म ।
करित मार्गी दरकूचदरमुकाम ॥
जिजाबाई मनिं चिंतुनी भवांसी ।
होय जुन्नरशिवनेरिदुर्गवासी ॥ १५ ॥
अधीं श्रीमंतीव्यवस्था सुरेख ।
वरी दादोजीचीहि देखरेख ॥
उणिव तेथें मग कायशी पडावी ? ।

१ श्रीशंकरास.

एक पतीविण ती सर्व सौख्य भावी ॥ १६ ॥

## ( स्रग्धरा. )

### श्लोक.

दादोजीच्या सुसंगें चिर वसुनि सुखानंदवृत्ति-स्वभावें ।
नित्यान्हीं श्रीशिवाई पुजुनिकरितसे प्रार्थना एकभावें ॥
मातें, श्रीदेविमाते तुजसि नवसितें, दे असा पुत्र गुंडा ।
लोकीं सत्कीर्तिचा जो फडकविल सदां आपला दिव्य झेंडा १७

### पद.

( दैवयोग दुर्विपाक आजि ज्हाला० ) या चालीवर.

धांव पाव श्रीशिवाइ अंबिके मला ॥
या विपदटविंत भ्रमुनि जीव कोमला ॥ ध्रु० ॥
व्यर्थ वांकडा अह्मांस होय मत्पिता ॥
प्राप्त होय पतिस त्यामुळें विदेशता ॥
तत्प्रेमाहि मजवरचें उडे सर्वथा ॥
पति तिकडे, मी इकडे, ही जडे व्यथा ॥
त्वत्कृपेंच शीघ्रघडो उभयं योगता ॥
द्यावा कीं जीव गमे गिळुनि सोमला ॥ १ ॥ धांव पाव०
या वेळीं करुनि कृपा पुत्र दे असा ॥
जो प्रकाशवील धरा स्वैयंतेजसा ॥

---

१ दारिद्र्यवनांत. २ आम्हां उभयतांचा संयोग. ३ स्वप्रकाशानें.

कमला । विलोकुनी भृंगरूपनयनीं । बहु गहिंवरुनी निरोप घेउनि । स्वारीची मग रवानगी देतसे करूनी । मनीं शहाजी होउनि कष्टी । उलटला परत माघारीं ॥ १ ॥ त्या जिजाबाईची स्वारी० ॥ ध्रु० ॥ १२ ॥

## शहाजीचें विजापुरास जाणें.

### आर्या.

इकडे निरोप घेउनि राणीचा, चिंतुनी स्वकुल देवी ।
शाहाजी, संभाजीसुतसह बहिर सव्यपद ठेवी ॥ १३ ॥
नारोपंतहणमंते यांसह सोडूनि दौलताबाद ।
धरि पंथ विजापुरचा स्थिर ठेवुनि चित्तवृत्ति सानंद॥१४॥

## जिजाबाईचें शिवनेरीवर वास्तव्य.

### दिंड्या.

स्नानपूजा उरकूनि नित्य कर्म ।
करित मार्गी दरकूचदरमुकाम ॥
जिजाबाई मनिं चिंतुनी भवांसी[1] ।
होय जुन्नरशिवनेरिदुर्गवासी ॥ १५ ॥
अर्धी श्रीमंतींव्यवस्था सुरेख ।
वरी दादोजीचीहि देखरेख ॥
उणिव तेथें मग कायशी पडावी ? ।

१ श्रीशंकरास.

एक पतीविण ती सर्व सौख्य भावी ॥ १६ ॥

## ( स्रग्धरा. )

### श्लोक.

दादोजीच्या सुसंगें चिर वसुनि सुखानंदवृत्ति-स्वभावें ।
नित्यान्हीं श्रीशिवाई पुजुनिकरितसे प्रार्थना एकभावें ॥
मातें, श्रीदेविमाते तुजसि नवसितें, दे असा पुत्र गुंडा ।
लोकीं सत्कीर्तिचा जो फडकविल सदां आपला दिव्य झेंडा १७

### पद.

( दैवयोग दुर्विपाक आजि जहाला० ) या चालीवर.

धांव पाव श्रीशिवाइ अंबिके मला ॥
या विपदटविंत[1] भ्रमुनि जीव कोमला ॥ ध्रु० ॥
व्यर्थ वांकडा अह्मांस होय मत्पिता ॥
प्राप्त होय पतिस त्यामुळें विदेशता ॥
तत्प्रेमाहि मजवरचें उडे सर्वथा ॥
पति तिकडे, मी इकडे, ही जडे व्यथा ॥
त्वत्कृपेंच शीघ्रघडो उभयें[2]-योगता ॥
द्यावा कीं जीव गमे गिळुनि सोमला॥ १॥धांव पाव०
या वेळीं करुनि कृपा पुत्र दे असा ॥
जो प्रकाशवील धरा स्वैंयंतेजसा[3] ॥

१ दारिद्र्यवनांत. २ आम्हां उभयतांचा संयोग. ३ स्वप्रकाशानें.

लोकीं निजसत्क्रातिचा उमटविल ठसा ।
रिपुंस आत्मशौर्यबळें पसरविल पसा ॥
हरुनि सर्व दुष्टमार तोषविल रसा ।
ठेवीं मच्छिरीं वरदहस्त आपुला॥२॥ धांव पाव०॥

## श्लोक.

### नक्कल.

( इतर स्त्रियांचे डोहळे. )

डेफसे, ढेंकळें खाणें । चिंचोका, कोय, रेवडी ॥
फुटाणे, कोडुळें, पीठ । डोहळे नच हे भले ॥ १९ ॥

( जिजाबाईचे डोहळे. )

जिजाबाइ होऊनियां गर्भरूप ।
भरे शौर्य आंगीं चढोनी हुरूप ॥
ह्मणे भान ना राहुनी, आत्मलोकां ।
धरारे पिटा म्लेंच्छ हे दूर हाका ॥ २० ॥
अविंधींच सर्वत्र वेष्टें धरा[1] ही ।
खुला हिंदुला ठाव कोठें न राही ॥
कुठें ढाल, तल्वार, आणा त्वरें ती ।
स्वयें म्लेंच्छशत्रूंस मर्दीन हातीं ॥ २१ ॥
न जाणे मनीं हिंदुंची जात कांहीं ।

१ पृथ्वी.

अशी यावनीराजसत्ता नको ही ॥
जिनें हिंदुधर्मास केलें मलीन ।
अशा म्लेंच्छसत्तेस मी शृंखलीन ॥ २२ ॥
करीं खड्ग एक्या, दुज्या[1] तें कुराण ।
ह्या वेदशास्त्रांहि नेले पुराण ॥
करोनी स्वपादींच ते म्लेंच्छ लीन ।
स्वयें हिंदुधर्मास मी उज्वलीन ॥ २३ ॥
सुसंस्थापुनी हिंदुंची बादशाही ।
सुखी नित्य ठेवीन सारी प्रजा ही ॥
जगीं धन्य हा भूप गोविप्रपाल ।
असे बोलवूनीच घेईन बोल ॥ २४ ॥

## शिवरायाचें जन्म.

पद. ( सुंदर मुख तुंदिल. ) या चालीवर.

जनहो शिवनेरि-गडीं अवतरे शिव ॥ चाल ॥ धावूं, जाऊं, पाहूं, तें प्रभुमुख, पावुनि सुख, बघुं महोत्सव ॥धृ.॥

भूपशालिवाहनाख्यशकाभीतरीं ।
पंध्राशें-एकुणपन्नासवत्सरीं ॥
वैशाख शुक्लबीज बृहस्पतिसुवासरीं ।
माध्यान्हीचा मरीच ठेपतां शिरीं ।
केंद्रींच्या उच्च चार शुभग्रहांवरी ।

१ दुसऱ्या हातांत.

प्रसवे सुतरत्न जिजाबाइ सुंदरी ॥
चाल ॥ मोपा, तोफा, झोंपा, त्यजुनि, जगति, गर्जुनि
अति दाविती शिव॥१॥जनहो शिवनेरी.॥२९

### श्लोक.

"अब्दे वै प्रभवाभिधे नरपते शालिप्रवाहात्परम् ।
शाके वेदनवाब्धिकेंदुशरके (१५४९) मासे च सन्माधवे ॥
नक्षत्रे(४)त्र तिथौ विधौ(२)गुरुदिने पक्षे सिते शाहजे-
जातो नाम शिवाजि को नरवरो यो वै हुतांशो हिते"॥१॥
" शिवाजिवर्मा नृपतिर्बभूव ।
वैशाखमासे सितपक्षमध्ये ॥
गुरौ द्वितीया विधिभान्विते हि ।
नागाब्दनूनं शशिबाणवर्षे " ॥(१५४९)॥२॥

श्रीशिवदिग्विजय—बखर.

### आर्या.

मृगमद गंधीं, भगणीं शशांक कीं मृगगणांत केसरिसा ।
तैसा रायशिवाजी जन्मे त्या भोंसलेकुळीं परिसा ॥ २० ॥

## जन्मोत्सव.

### घनाक्षरी.

कितिक तोफा अनिवार । मनीं धरुनि अहंकार ।
करुनि गर्जनेस थोर । धूमधाड धडकती ॥ १ ॥
मधुर सनया, सारंग । गाउनि देती बहुरंग ।

करिति अंतरंग दंग । झडुनि चौघडे किती ॥ २ ॥
करुनि दुंदुमी पुकार । देति शृंगें ललकार ।
शंख गर्जति भुंकार । कर्णिकाहि वाजती ॥ ३ ॥
सडा चंदनजलयुक्त । वरि रांगुळ्या विचित्र ।
ध्वजा, तोरणें पवित्र । चहूंकडे फडकती ॥ ४ ॥ २७
ब्राह्मणांस दानधर्म । सर्व सेवकां इनाम ।
दीनजनां वस्त्र, दाम । मिळुनि कुशल बोलती ॥ १ ॥
सुवासिनी बायकांस ! हळदिकुंकुमें सरास ।
खणश्रीफलाप्रयास । मिळुनि, हर्ष पावती ॥ २ ॥
विडे शर्करा प्रशस्त । मिळुनि हर्षले समस्त ।
धाडुनि जुन्नरनगरांत । घरोघरीं वांटिती ॥ ३ ॥
नित्य दीपोत्सव थोर । कथा अंबिकेसमोर ।
नृत्य गान महापूर । सकल लोक ऐकती ॥४॥२८॥

## जातकर्म व नामकर्म.

### साक्या.

जिजाबाइनें सविधि करविलें जातकर्म पुत्राचें ।
सुंदरशिशुमुख पाहुनि, जो, तो, बोले, 'मंगल' वाचे १।२९
शिवप्रसादचि जाणुनि माता गेली शरण शिवा जी ।
करुनि बारसोत्सव, त्या बाळा ठेवी नांव शिवाजी २।३०
किल्ला शिवनेरी । धन्यधन्य या महीवरी ॥ ध्रु. ॥

---

१ प्रयासावांचून खण व नारळ.


# पुत्ररत्न झाल्याचें शहाजी राजे यांस पत्र.

## श्लोक.

होऊनी आपणाला कुमर शुभदिनीं, बाग्से होय आजीं ।
प्रोत्साहें नांव त्याचें सकलजनमतें ठेवियेलें शिवाजी ॥
ऐसें दादोजि पत्र स्वकरिं लिहुनि तें सिंचुनी कुंकुमातें ।
शाहाजीलागिं धाडी झणि विजयपुरीं[1] सांडणीस्वारहातें।२१

## समाप्त.

१ विजापुरास.



# कथानक तिसरें.

## श्रीशिवबालक्रीडा.

### विषयानुक्रम.

( १ बालक्रीडा. २ स्वाभाविकगुण. ३ खेळ. ४ शिवबाळावरील जिजाबाईचें प्रेम. ५ संपादित गुण. ६ जनविस्मय. ७ विजापूरच्या बादशाहींत शहाजीचा भाग्योदय ८ शहाजीचें दुसरें लग्न व पुत्रप्राप्ति आणि पहिल्या जिजाबाई स्त्रीची विस्मृति. ९ शिवाजीचे अद्भुत गुण लोकमुखांनीं वारंवार कानीं येऊन पुत्रमोहामुळें शहाजीस त्याच्या भेटीची इच्छा. १० जिजाबाई-स्त्रीसहवर्तमान पुत्रशिवाजीची भेट. ११ सर्वांचें एकत्र वास्तव्य. व शिवाजीचें लग्न. )

## बालक्रीडा.

### ओंव्या.

शुक्लपक्षीची चंद्रकोर। तैसा वाढूनि उत्तरोत्तर।
रांगू, चालूं, शिवकिशोर। बोलूं खेळूं लागला ॥ १ ॥
परिसूनि बोबडे बोल मधुर। अचाटकल्पना यत्न थोर।
देखूनि खोड्याही अनिवार। माय वारंवार आनंदे ॥ २॥

पाहूनि नाना खेळ लीला । कौतुक वाटे मावलीला ।
चुंबन घेऊनि वेळोवेळां । प्रेमें शिवबाळा कुरवाळी॥३॥

## स्वाभाविक गुण.

### दिंड्या.

चपळ तेजस्वी तीव्रमति हुषार ।
धीट चौकस धोरणी समजदार ॥
सुधी निर्धारी हिकमतीहि फार ।
सदानंदी स्नेहाळु महोदार ॥ ४ ॥
हूड निर्भीडहि तरतरीत साच ।
महोद्योगी बहु खटपटी तसाच ॥
समयसोसिक निर्धास्त सांवधेति ।
दिसुनि शिवगुण हे शिशुपणींच येती ॥ ५ ॥

## खेळ.

### श्लोक.

बोले मित्रांस, घोडा करुनि मजसवें काठिचा शीघ्र दौडा ।
गांठा वैऱ्यांस, झोडा, रिपुंवरि पळत्या बंदुकीबाण सोडा ॥
दुष्टांची खोड मोडा अटकित बसवा पायिं घालुनि खोडा।
दीनां जीवंत सोडा जगतिं बहु अशा कीर्तिनामास जोडा॥६
राजाची तों कचेरी भरवुनि सगळी, भोंवतीं मित्रमेळा ।

---

१ सावध+इति.

मध्यें ती न्यायमूर्ती शिवशिशु बसुनी, खेळतां राजखेळा ॥
कोणा एका गुन्ह्याची करुनि चवकशी, अल्प कोणास दंड, ।
कोणा सोडूनि देई, धडकुनि कितिकां कैद सांगे उदंड ॥७॥

### दिंड्या.

शिकारीचा तो खेळ खेळतांना ।
धरुनि काठीचा नेम सावजांना ॥
बघुनि लटकें, ती साधली शिकार ।
वदुनि, बोले मी कसा नेमदार? ॥ ८ ॥
असे नानाविध खेळ मित्रसंगें ।
खेळतांना शिवबाळ त्यांत रंगे ॥
सहज फिरतां बोलतां आपसांत ।
सैन्य, शस्त्रास्त्रें हीच वदे मात ॥ ९ ॥

## शिवाजीवरील मातेचें प्रेम.

### श्लोक.

पाहूनि ऐशा शिवबाळलीला । तें होतसे कौतुक मावलीला ॥
बोले विभो, या शिवरायबाळा । राखीं शताब्दायु सुखी कृपाळा ॥ १० ॥
ना वावगी दृष्ट पडो, ह्मणूनी । होनैके ओंवाळुनि त्यावरुनी,
तें द्रव्य दीनां गरिबांस वांटी । ऐसा तिचा नेम असे पहाटीं ॥ ११ ॥

---

१ भरपूर. २ एक होन.

# संपादित गुण.

## साक्या.

घेउनि तालिम, करूनि कसरत, घेइ उड्या मलखांबीं ॥
बरोबरीच्या सवंगड्यांशीं झुंजुनि खेळे झोंबी ॥ १२ ॥
छडी दांडपट्टा बोथाटी शिकुनी जेठिकेलाही ॥
भिडुनि गड्यांशीं, मारा चुकवुनि, ना थकतां टिकलाही १३
हयरोहणिं, शस्त्रास्त्रधारणीं, मग्न सदां जो राही ॥
यत्प्राविण्य बघूनि करावें बहुत नवल थोरांहीं ॥ १४ ॥

## ओंव्या.

ऐसे क्षात्रधर्मोचित नाना गुण । व्यर्थ न दवडितां आपला क्षण । नित्य व्यासंगें अभ्यासून । झाला प्रवीण त्यांमध्यें ॥ १५ ॥ केवळ सात वर्षांच्या वयांत । ऐसें गुणकर्तृत्व अद्भुत । पाहूनि शिवबाळाची इभ्रत । लोक बोलती काय तें ॥ १६ ॥

# जनविस्मय.

## छंद दिंडका.

जन ह्मणति, नव्हे हा बाळ, निवळ वेताळ ।
भासतोच दुर्जनकाळ ॥ ध्रु० ॥

1 मल्लविद्या. २ थोरथोर मल्लांनीं.

वय काय ! निपुणता काय ! उमेदहि काय ! ।
उद्योगशीलता काय ! ॥ १७ ॥
गुण काय ! करामत काय ! सहनता काय ! ।
खटपटी प्रयत्नहि काय ! ॥ १८ ॥
मति काय ! कल्पना काय ! धूर्तता काय ? ।
चतुरता दक्षता काय ! ॥ १९ ॥
स्मृति काय ! धर्मरति काय ! आत्मता[1] काय ! ।
जनपदाभिमानहि[2] काय ॥ २० ॥
मर्दुनी वैरियां होइल हा भूपाळ ।
भासतोच दुर्जन काळ ॥ २१ ॥

### आर्या.

माय जिजाबाईचा ऐसा शिवबाळ कंद हर्षाचा ।
दिन दिन वाढुनि शिशु तो त्या समयीं होय सात वर्षांचा २२
आतां विजापुरीं त्या क्षणभर सिंहावलोकनें वळुन ।
पाहूं काय शहाजी करितो तें सर्व यावया कळुन ॥२३॥

## विजापूरच्या बादशाहींत शहाजीचा भाग्योदय.

### फटका.

सानुकूल होऊनि दैव तें भाग्यकाल येतां उदया ।

---

१ आपलेपणा. २ देशाभिमान.

सर्व नेटकें होउनि, जन तो कां न जगीं पावेल जया?॥ध्रु०
शौर्य, धैर्य, कर्तृत्व, पराक्रम शहाजिचे गुण परोपरी ।
जाणुनि, तुष्टुनि होय तयावर अदिलशहाची कृपा पुरी ॥
अभय देउनी, बहु गौरवुनी जहाजिला निज दरबारीं ।
'राजे,' वदुनी तयास दिधली कायमची दुय्यम वजिरी ॥
निजामशाही-मनसबदारी-सरंजाम-मुलुख, त्यांवरी ।
तत्सत्ता स्थापूनि पूर्ववत् सर्व ठेविली बहादुरी ॥
त्यांतिल बारामति, इंदापुर, पुणें, सुपें, हें चत्वारि ।
शिवाय मावळ ह्या प्रांतांची दिली तयाला जहागिरी ॥

चाल—खेरिज कानडिमुलखांत ॥
जहागीर बारा प्रांत ॥
दिधले जे बहु विख्यात ॥

शहाजिनें मग दुसरी केली तुकाबाई नामें जाया ।
पहिलीचा अर्थात विसर मग पडुनि जडे हिजवर माया
॥ १ ॥ सानुकूल० ॥ ध्रु० ॥२४॥

## दुसरी स्त्री वरिल्यामुळें पहिलीची विस्मृति.

### श्लोक.

तुकाबाई कांता सविधि वरितां सुंदरि युवा[1] ।

---

1 तरुणी.

जडे शहाजीचें मन तिजवरी यामिनिदिवां[1] ॥
तिच्यासंगें काळ क्रमुनि पुरतंजावरिं वसे ।
जहाला व्यंकोजी कितिकदिवशीं पुत्र नवसें ॥ १९ ॥
नव्या साऱ्या ऐशा विभवगृहदारासुतधनीं ।
शहाजी मोहोनी भुरळ पडुनी जाय रमुनी ॥
जिजाबाईस्त्रीचा ससुत पडला त्या विसर तो ।
शहाणाही वेळीं चुकुनि हितकार्यीं घसरतो ॥ २० ॥

## शहाजीस शिवाजीच्या भेटीची इच्छा.

### दिंडया.

दुर्गशिवनेरीकडिल वर्तमान ।
नित्य दादोजीकडुनि ये लिहून ॥
कितिक येउनि, भेटूनि लोक जातीं ।
कथुनि शिवगुण, ते तद्यशास गातीं ॥२७॥
शिवाजीचे गुण आद्वितीय कानीं ।
नित्य परिसूनी महाजनमुखानीं ॥
पित्या शाहाजिस होय धन्यता, तीं ।
कुठुनि येइल सामान्य अन्यतांतीं[2]! ॥२८॥

### साक्या.

सुतस्नेहनिर्झरें[3] जनकहृत्सर[4] तुडुंबुनी नेटें ॥

१ रात्रंदिवस. २ इतर बापांचे ठिकाणीं. ३ पुत्रप्रेमरूप झऱ्यानें.
४ पित्याचें हृदयरूपसरोवर.

सर्व नेटकें होउनि, जन तो कां न जगीं पावेल जया?॥ ध्रु०
शौर्य, धैर्य, कर्तृत्व, पराक्रम शहाजिचे गुण परोपरी ।
जाणुनि, तुष्टुनि होय तयावर अदिलशहाची कृपा पुरी ॥
अभय देउनी, बहु गौरवुनी जहाजिला निज दरबारीं ।
'राजे,' वदुनी तयास दिधली कायमची दुय्यम वाजिरी ॥
निजामशाही-मनसबदारी-सरंजाम-मुलुख, त्यांवरी ।
तत्सत्ता स्थापूनि पूर्ववत् सर्व ठेविली बहादुरी ॥
त्यांतिल बारामति, इंदापुर, पुणें, सुपें, हें चत्वारि ।
शिवाय मावळ ह्या प्रांतांची दिली तयाला जहागिरी ॥

चाल—खेरिज कानडिमुलखांत ॥
जहागीर बारा प्रांत ॥
दिधले जे बहु विख्यात ॥

शहाजिनें मग दुसरी केली तुकाबाई नामें जाया ।
पहिलीचा अर्थात विसर मग पडुनि जडे हिजवर माया
॥ १ ॥ सानुकूल० ॥ ध्रु० ॥२४॥

## दुसरी स्त्री वरिल्यामुळें पहिलीची विस्मृति.

### श्लोक.

तुकाबाई कांता सविधि वरितां सुंदरि युवी[1] ।

---

1 तरुणी.

जडे शहाजीचें मन तिजवरी यामिनिंदिवीं[1] ॥
तिच्यासंगें काळ क्रमुनि पुरतंजावरिं वसे ।
जहाला व्यंकोजी कितिकदिवशीं पुत्र नवसें ॥ २५ ॥
नव्या साऱ्या ऐशा विभवगृहदारासुतधनीं ।
शहाजी मोहोनी भुरळ पडुनी जाय रमुनी ॥
जिजाबाईस्त्रीचा ससुत पडला त्या विसर तो ।
शहाणाही वेळीं चुकुनि हितकार्यीं घसरतो ॥ २६ ॥

## शहाजीस शिवाजीच्या भेटीची इच्छा.

### दिंडया.

दुर्गशिवनेरीकडिल वर्तमान ।
नित्य दादोजीकडुनि ये लिहून ॥
कितिक येउनि, भेटूनि लोक जाती ।
कथुनि शिवगुण, ते तद्यशास गाती ॥२७॥
शिवाजीचे गुण अद्वितीय कानीं ।
नित्य परिसूनी महाजनमुखानीं ॥
पित्या शाहाजिस होय धन्यता, ती ।
कुठुनि येइल सामान्य अन्यतांनीं[2]! ॥२८॥

### साक्या.

सुतस्नेहनिर्झरें[3] जनकह्त्सर[4] तुडुंबुनी नेटें ॥

---

१ रात्रंदिवस. २ इतर बापांचे ठिकाणीं. ३ पुत्रप्रेमरूप झऱ्यानें.
४ पित्याचें ह्रदयरूपसरोवर.

बाहेर पडुनि, वाहे खळखळ जळ नयनद्वयवाटे ॥
बोले, शिवबाळा । कैं पाहिन तुज मी डोळां ॥ २९॥
ऋषि[1] वर्षांचा होशी, तरि म्यां न देखिलें तुजलागीं ॥
चिंतामणिला दगड समजलों, ऐसा मी हतभागी ॥
स्वप्ना विस्मरलों । त्वत्संगा मी अंतरलों ॥ ३० ॥

## आर्या.

होउनि खेद असा बहु दादोजिस लिहुनि पाठवी पत्र॥
यावें शिघ्र विजापुरिं सह घेउनि मत्कलत्र शिवपुत्र॥३१॥
तंजावराहुनी मग सुतभेटीचा धरूनि बहु हेत ॥
स्त्रीपुत्रांसमवेतच निघुनि शहाजी विजापुरीं येत ॥ ३२ ॥

# शिवाजीची भेट.

## श्लोक.

धन्याची आज्ञा ती त्वरित शिवनेरीं थडकतां ।
तयारी स्वारीची करुनि झट, दादोजि सवंता[2] ॥
शिवाजीबाळातें जननिसह घेऊनि, निघुनी ।
त्वरें पोंचे मार्ग क्रमितच विजापूरभुवनीं ॥ ३३ ॥
पित्यापुत्रांची त्या गृहणिपतिची भेट घडुनि ।
महोत्साहें तेव्हां प्रकटत महानंद सदनीं ॥

---

१ सात. २ स्वतंत्र.

शहाजीराजाची मिळवुनि अनुज्ञा मग पुढें ।
त्वरें दादोजी ये परतुनि पुणेंजुन्नरकडे ॥ ३४ ॥

## सर्व कुटुंबाची एकत्र नांदणुक व शिवाजीचें लग्न.

### ओंव्या.

मग शहाजी विजापुरांत । सर्व कुटुंबासमवेत ।
नांदो लागला यथास्थित । सानंदचित्त होऊनी ॥ ३५
शिवबाळाचे अंगभूत । धैर्यशौर्यादि गुण अद्भुत ।
पाहूनि चित्तीं विस्मित । वारंवार होतसे ॥ ३६ ॥

### आर्या.

सांगूनि शिवाजिवरा निंबाळकरात्मजा वधू आली ॥
ती श्वशुरशहाजीला सासुजिजाबाइलाहि मानवली ॥३७॥
मग लग्नसोहळा तो तोषविता होय चारिवर्णांतें ॥
साक्षाच्छिवचि शिवाजी भासे सइबाइ अन्नपूर्णा ते ॥३८॥

समाप्त.

# कथानक चवथें.

## अल्प वयांतील श्रीशिवाजीचे गुणकर्तृत्वपराक्रम.

### विषयानुक्रम.

[ १ शिवाजीची व विजापूरच्या आदिलशहा बादशहाची भेट. २ शिवाजीस शहाजीचा उपदेश. ३ शहाजीस शिवाजीचें उत्तर. ४ शहाजीचा आपल्याशीं विचार. ५ दादोजी कोंडदेवास शहाजीचें पाचारण व सांगणें. ६ शहाजीचें परत तंजावरास जाणें. ७ शिवाजीपुत्रासह जिजाबाईचें पुणें येथें जाऊन राहणें. ८ दादोजीचें आपल्याशीं ह्मणणें. ९ विषयविवेचन. १० मावळे लोकांशीं शिवबायाचें भाषण. ११ विषयविवेचन.

## शिवाजीची व बादशहाची भेट.

### श्लोक.

( सवाई. )

सावध शूर चलाख सुनिश्चइ निर्भय चौकस धूर्त शहाणा।
मल्लकला-हयरोहविशारद सूरत केवळ मौक्तिकदाणा ॥
शाहजिचा प्रियपुत्र असा, परिसूनि असें बहु लोकमुखानें।

भेटिस आण ह्मणूनि शहाजिस सांगितलें मग बादशहानें ॥ १ ॥
पंचहत्यारि बनूनि, सुरेखित वेष पुरा थाटुनि सरदारी ।
तातसवें शिवबाळ निवेशुनि भूपतिच्या भरल्या दरबारीं ॥
तीर तसा सरसावुनि थेट, करूनि न बादशहास सलाम ।
केसरिसा बसला टवकारुनि, विस्मय पावति लोक तमाम ॥ २ ॥

# शहाजीचा उपदेश.

## श्लोक.

( अमृतध्वनी. )

बाहूनि सन्निध, शहाजी तया वदत, बारे शिवाजि तनया, ।
सोडूनि अल्लडपणा, वर्त तूं धरुनि आतां तरी सुविनया[1] ॥
जो बादशाह ममताळू धनी परम त्या अन्नदातृ हुजुरा ।
तद्दर्शनीं लवुन, हस्तद्वयीं ढुरुन बा जा करीत मुजरा ॥ ३ ॥

# शिवाजीचें उत्तर.

## फटका.

( अहो राव. या धर्तीवर. )

अहो तात । शिवाजी बोले । पावूं नका कष्टा ।
न मी वंदीन शिखानष्टां ॥ ध्रु. ॥
अहो तात । दरोडेखोर । यवन हे पहा कुठले ।
अह्मां भारतियांवर उठले ॥

1 लीनता.

अहो तात । धुडकवुनि आह्मां । हे यवन दुष्ट कसले ! ।
आमच्या घरामध्यें घुसले ॥
अहो तात । हरुनि सर्वस्वा । होऊनि धनी बसले ।
आमची मौज बघुनि हंसले ॥
अहो तात । खाउनी अमुचें । इच्छेस रुचे तसलें ।
आमच्या मुखा पान पुसलें ॥
अहो तात । भवत्सुत[1] जरि मी । तरि दंडिन त्या दुष्टां ।
न मी वंदीन शिखानष्टां ॥१॥४॥

## शहाजीचा आपल्याशीं विचार.

### पद.

[ ना दे चित्ता शांती. या चालीवर. ]

शिवाजिचा हा बोल शहाजी परिसुनि मनिं खचला ।
ह्मणे अमृतबीजाच्या पोटीं निपजे हा कुचला ॥ धृ. ॥
सिंहाशीं झुंजाया भवतो बऱ्हाश्चर्य ससा! ॥
सूर्यापुढती प्रकाश दाविल खद्योत न सहसा ॥
पक्षीन्द्राची बरोबरी ती मशक करील कसा ? ॥
निज उड्डाणें ध्वांक्षें[2] कसा तो जिंकिल कलहंसा ? ॥
स्वशक्ति नेणुनि, कांहींतरि हा अर्भक वचवचला ॥ १ ॥
॥ शिवाजिचा हा बोल. ॥
कांहींहि असो एकंदरीनें दिसतें हें स्पष्ट ॥

---

१ आपला मुलगा. २ कावळा.

कोणे दिवशीं हा शिशु मजवर उद्भविल अरिष्ट ॥
आपण भोगुनि, मजला लाविल भोगाया कष्ट ॥
मजपासुनि यास दूर करणें, हीच बरी गोष्ट ॥
यद्दुष्कृत्यें हुरूप माझा सर्वपरी खचला ॥ २ ॥
॥ शिवाजिचा हा बोल. ॥ १ ॥

### अंजनीगीत.

सवतीसवतींचाही तंटा । बाहेरवेरी बहु बोभाटा ।
तेणें कधिं न सुखाचा वांटा । शाहजिला लाभे ॥ ६ ॥
बहुत तुकाबाई आवडती । ह्मणुनि जिजाबाईला सवती ।
ठेवावी, हीच गोष्ट चित्तीं । शाहजिला रुचली ॥ ७ ॥

### आर्या.

या उभय मायलेकां दादोजीच्याच दक्षतेखालीं ॥
सत्वरचि पुणेंग्रामीं ठेवावें, हेंच योग्य या कालीं ॥ ८ ॥
दादोजीस लिहुनि मग शाहाजी सन्निधान बोलावी ॥
बोले, तुमच्यापाशीं वाटे गुजगोष्ट एक बोलावी ॥ ९ ॥

## दादोजीस शहाजीचें सांगणें.

### श्लोक.

सप्ताब्द ह्या शिशुचिया गणती वयाची
तेजस्विता परि न सोसत तीव्र याची ॥

१ पर्वत. २ वेगळी. ३ सात वर्षे.

हा कोणत्या मजशिं पाडिल कीं अरिष्टीं ।
हा नेम ना, ह्मणुनि मी मनिं फार कष्टी ॥ १० ॥

ह्या ठेवणेंच मजपासुनि दूर कोठें ।
होईल तें मज सुखावह यांहि मोठें ॥
शिक्षेंत यास तुमच्याच सदैव ठेवा ।
दावा सुपंथ उपदेशुनि भूमिदेवां ॥ ११ ॥

हा हूडही अल्लड पोर भारी ।
बोधूनि याला वळवा विचारीं ॥
हा आमुच्या सत्कुलकीर्तिनांवा ।
राखील, ऐशा सुपथास लावा ॥ १२ ॥

घेऊनि ह्मास जननीसह जा पुण्यास ।
निर्धोरता तरिच होइल मन्मनास ॥
"भाचा" तुह्मी ह्मणविला, तरि ह्या जपून ।
देऊनि शिक्षण करा व्यवहारपूर्ण ॥ १३ ॥

संगें घेउनि जात जा मन सदां ठेवूनि ह्याच्या हितीं ।
याला द्या करुनी जहागिरिचिया प्रांतांतली माहिती ।
संपादील, कृतघ्नता त्यजुनि हा मर्जी शहाची,असा
याला बोधुनि राजनिष्ठ बनवा; द्या स्वास्थ्य मन्मानसा ॥ १४ ॥

१ यालाही. २ हे विप्रश्रेष्ठा.

## शहाजीचें परत तंजावरास जाणें.

### अभंग.

केला कर्नाटकजाहगिरप्रांतीं । नारोहणमंती बंदोबस्त ॥
परंतु मोडाया बाकीचे बखेडे । जावया तिकडे भाग आलें ॥
संभाजी व्यंकोजी दोघे पुत्र आणि । आवडीची राणी तुकाबाई
यांसह शहाजी निघूनी सत्वरीं । जाय तंजावरीं रहावया॥ १५

## शिवाजीचें पुण्यास वास्तव्य.

### आर्या.

निघुनी विजापुराहुनि घेउनि त्या उभयमायलेंकांतें ॥
आला पुण्यग्रामीं दादोजी; पुढिल वृत्त ऐका तें ॥ १६ ॥
वेंचूनि द्रव्य बहुत दिव्यप्रासाद[1] निर्मुनी तेथ ॥
शिवराय जिजाबाइंस ठेवितसे नेटक्या व्यवस्थेंत ॥ १७ ॥
शिशु बारा वर्षांचा, तरि वीर्ये भासलाच केसरिसा ॥
धर्मरति, स्वाहंकृति[2], शौर्योद्यम, ह्या गुणीं दिसे सरसा १८

## दादोजीचा आपल्याशीं विचार.

### श्लोक.

पाहूनि ऐशा गुणलक्षणांतें ।
दादोजि निभ्रांत वदे मनातें ॥
हा आज तों[3] बाळ दिसे, तथापि ।

१ सुंदरवाडा. २ आपलेपणाचा अभिमान ३ तर.

होईल भूपाळ महाप्रतापी ॥ १९ ॥
यद्धस्तिंची ही 'विजया' सुरेषा ।
जिंकील त्याही प्रबळा सुरेशा ॥
हा दुर्जनां दंडुनि आत्महस्तें ।
देईल लोकीं सुख सज्जनांतें ॥ २० ॥

पद.

( दैवयोग दुर्विपाक० या चालीवर. )

शिशु लहान तरि, महान हा पराक्रमी ।
दिसति यांत सुगुण जे नृपाळविक्रमी[2] ॥ ध्रु० ॥
भासत हा बाळ शत्रुकाळ जिष्णुसा ॥
लोकोत्तर सत्कृतिचा उमटविल ठसा ॥
जिंकुनि रिपु, त्यांजकडुनि पसरविल पसा ॥
स्थापुनि निजहिंदुराज्य तोषविल रसा[3] ॥
पाडिल हा योध्यांसहि थोर संभ्रमी ॥ १ ॥
शिशु लहान तरि महान० ॥ ध्रु० ॥ २१ ॥

श्लोक.

वात्सल्यें मज भासतो शिवच हा कीं निर्दयत्वें यम ।
शौर्यें भासत जामदग्न्य[4] मज कीं धैर्यें गमे विक्रम ॥
दातृत्वें मज अंगराज[5] गमतो कीं इंद्र भाग्यें महा ।
निर्धारें मज गाधिजप्रभुच[6] कीं धर्में गमें धर्म हा ॥२१॥

१ याच्या हातावरील. २ विक्रमराजाचेठायीं. ३ धरत्री. ४ परशुराम. ५ कर्ण. ६ विश्वामित्र राजा.

# विषयविवेचन.

## आर्या.

बुद्धि विलक्षण, धोरण पाहुनि तैसेच सर्व राजगुण ॥
दादोजी कितिक कला शिकवी, झट होय त्यांत तो निपुण २२

## श्लोक.

जात्त्या जो बहु पाणिदार मुलगा बत्तीस संल्लक्षणी ।
वाढे त्यांतुनि राजकार्यपटुशा दादोजिच्या शिक्षणीं ॥
दादोजी चतुर प्रबुद्ध मिळतां श्रीकृष्णसा सारथी ।
तेथें तो शिवजिष्णु[1] कां धरिल ना गीतारहस्यीं रती २३

नित्य भागवतपुण्यपावित्रें ।
भारतीयनृपवीरचारित्रें ॥
सांगुनी कितिक नैतिक गोष्टी ।
देत दादुजि शिवाजिस तुष्टी ॥ २४ ॥

आख्यायिकाहि चुटके सुविचारणीय ।
गोष्टी तशाच कथुनी किति राजकीय ॥
बोधी बहू परि, शिवाजिचिया ठिकाणीं ।
तें पालथ्या जणु घड्यावर होय पाणी ॥ २५ ॥

## आर्या.

निपजुनि बलाढ्य शूरहि शिकला सारी मलंगयुद्धकला[2] ॥

---

१ शिवाजीरूप अर्जून.　२ मल्लविद्या.

हिमजलदोष्णतृषाक्षुत् सोसुनि नग लंघितांहि ना थकला २६
झाल्या अत्यंत प्रिय भागवतीभारतीकथा ज्याला ॥
तेणें स्वधर्मनिष्ठ स्वकर्मतत्पर असाच तो झाला ॥ २७ ॥
सत्यैक हिंदुधर्मचि मानुनि रमला तयांत दिनरात ॥
तेणें पूर्ण जयाच्या भरलासे स्वाभिमान हृदयांत ॥ २८ ॥

## श्लोक.

देणारेच जिवास जीव असले जे शूर, ते मावळे ।
सर्वस्वी वश घेतले करुनियां प्रोत्साहुनि वाग्बळें ।
होऊनी तरबेत ती जनतती[1] युद्धार्थ आवेश घे ।
त्याचे कंक फसल्कर प्रियसखे मालूसरा हे तिघे ॥२९

## आर्या.

त्या लोकां मावळचे माहित नगपंथ सर्व, ह्मणुनि तयां ।
नेई सदा शिवाजी करावया आपुल्यासवें मृगया ॥ ३०॥

## दिंडी.

शिवाजीसह ते लोक एककाळीं ।
करुनि मृगया बैसतां तरूखाळीं ॥
अकस्मात उठुनि तो शिवाजिराय ।
चढुनि अंगांत स्फुरण ह्मणे काय ? ॥ ३१ ॥

---

१ लोकसमुदाय.

# मावळेलोकांशीं शिवरायाचें भाषण.

## पद.

( एडका मदन० या चालीवर. )

शिवाजीबाळ । बोलला काय तत्काळ ? ॥ ध्रु० ॥
चहूंकडे बघतां या काळीं ॥
अविंधमय ही धरा जहाली ॥
नुरे हिंदुंचा कोणी वाली ॥
जाहली राळ ॥ १ ॥ बोलला० ॥ ध्रु० ॥
यवन धरुनि निजधर्माहंता ॥
नित्य करिति हिंदूंच्या सुता ॥
बाटविती किति संतमहंतां ॥
अवघा घोळ ॥ २ ॥ बोलला० ॥ ध्रु० ॥
करुनि देवमंदिरच्या खांचा ॥
देव भंगिले मारूनि टांचा ॥
आतां तो विश्वेश कशाचा ॥
माहंकाळ ? ॥ ३ ॥ बोलला० ॥ ध्रु० ॥
सकळ अविंधां मर्दुनि हातें ॥
स्थापिन मी हिंदूराज्यातें ॥
तरीच जन्म दिला मज तातें ॥
प्रभो सांभाळ ॥ ४ ॥ बोलला० ॥ ३२ ॥

## विषयविवेचन.

### साकी.

सतत कंबरा बांधुनि तत्पर, असे मावळे सारे ॥
शिवाजिचे आज्ञांकित होतां,तेथें जय न कसा रे !११

### फटका.

चतुर शूर विश्वासु मावळे यत्संगें तो शिवराय ।
नित्य वापरुनि काय करितसे स्वकार्यार्थ यत्नोपाय ! ॥
सर्व पहाडी जवळिल रस्ते उतरचढीचे दरे कडे ।
घेइ करुनि माहित, सह्याद्री हिंडुनि धुंडुनि चहूंकडे ॥
दुर्गकोटगड अवघड सवघड एकाहुनि जे एकचढे ।
मलत्यावेषें शोधुनि पाही धोरण बांधावया पुढें ॥
किल्ले सर एकदम कराया गुप्तमार्ग सर्व तेवढे ।
हरयत्नें माहितींत आणी, ठेवुनि न कांहीं जिवाकडे ।
चाल–गुप्त हेर जासूद किती ॥
ठिकठिकाणची खरी स्थिती ॥
येउनि कळविति शीघ्रगतीं ॥
तशी व्यवस्था योग्य अगाऊ करावयाची जी काय ॥
सर्व करुनि ती, वर्ते चिंतुनि श्रीजगदंबेचे पाय ॥ १ ॥
चतुर शूर विश्वासु मावळे० ॥ ध्रु० ॥ ३४ ॥

### तोरणा किल्ला सरकरून हस्तगतकरून घेणें.

पद.–( बिहानिआये राम जनकपुर० या चालीवर. )

एकदिनीं मावळेलोक मग घेऊनि संगे शिवराय ।
आणुनि आटोक्यांत तोरणागड घ्याया चालुनि जाय ॥धृ०
बांधुनि पल्ला तोरणकिल्ला, त्याच्या येतां संधानीं ।
न करुनि गिल्ला, घालुनि हल्ला, करुनि घेतला सर त्यांनीं।
तो शिव तरणा, करि सुधारणा किल्ल्याची बहु यत्नांनीं।
खणितां रांजण गुप्त गवसले जे भरले धनरत्नांनीं ॥
कितिक ह्मणति जन, दिधलें हें धन प्रसन्न अंबा होऊनी।
ह्या धनसाह्यें, चढवुनि बाह्या कितिक मिळाले सेनानी[1] ।
एकुणिस वयवर्षी ऐसा विजयी होतां शिवराय ।
सांगे केसरि उभारुनि ध्वज गगनीं तद्धर्ष न माय ॥ १॥
एकदिनी मावळेलोक मग० ॥ धृ० ॥ ३९ ॥

१ सेनानायक.

समाप्त.

श्रीशिवछत्रपति.

# कथानक पांचवें.

## श्रीशिवरायास राजगुरु दादोजी कोंडदेव यांचा निर्याणकाळचा हितोपदेश.

### उपोद्घात.

#### श्लोक.

विश्वासू राजकार्यप्रविण मसलती धोरणी दूरदृष्ट ।
ज्ञानी सत्वाभिमानी चतुर पुरुष जो निश्चयी स्वामिनिष्ठ ।
शाहाजींचा असा जो नयनिपुण पुणेंप्रांतिचा कारभारी ।
दादोजीकोंडदेव क्षयगद जडुनी होय आसन्न भारी ॥ १ ॥

अशा अवस्थेंत मार्गशीर्ष महिन्याची शुक्ल एकादशी उगवून दोन घटिका दिवसाच्या सुमारास पुणें मुक्कामीं शिवाजीमहाराजांच्या वाड्यांतील आपल्या दिवाणखान्यांत

दादा हे मुखमार्जन उरकून बिछान्यावर लोडाशीं टेंकून बसून हळूहळू ईशनामस्मरण ध्यानपूर्वक करीत आहेत; मधून मधून दमभरून खोकला येत आहे व बाजूस सेवकजन आपआपल्या कामांत तत्पर उभे आहेत; आश्रितजन, कारकून, शिलेदार, मुत्सद्दी, मानकरी व तसेच गांवांतील संभावित गृहस्थ, सेटसाहुकार, स्नेहीजन आदिकरून मंडळी दादांच्या समाचारास येऊन त्यांच्या बिछान्याभोंवतीं जवळ, दूर, बसलेली आहे; वैद्य येऊन प्रकृति पाहून त्रिदोषनिवारक औषधांची योजना करीत आहेत; प्रातःस्नान तुळशीची पूजा वगैरे नित्यनेम बाईनें सारून सौभाग्यवती वज्रचुडेमंडित जिजाबाईसाहेब मोठ्या लगबगीनें दादांच्या समाचारास येऊन त्यांच्या बिछान्याजवळच बाजूस बसल्या आहेत; इतक्यांत पहाटेचा नित्यचा घोड्यावरील फेरफटका करून, आज दादांची तब्येत कशीकाय आहे हें पहावयास मोठ्या घांदलीनें शिवाजीमहाराजांची स्वारी तेथें दाखल होऊन, मातुश्रीचे व दादांचे चरणीं मस्तक ठेवून ते दादांचे जवळच समोर बिछान्यावर बसले.

प्रकृतीस रात्रीपेक्षां आतां कसें काय वाटत आहे ? ह्मणून जिजाबाईसाहेबांनीं विचारल्यावरून दादा हळूच ह्मणाले, " आईसाहेब, आतां आमच्या प्रकृतीचा भरंवसा

तो काय सांगावा ! दिवसानुदिवस शक्ति क्षीण होत होत ह्मावेळीं तर शरीरीं इतका हलकेपणा वाटत आहे कीं, बहुतेक दोन चार घटकांच्या आंतच आमची इहलोकची यात्रा संपणार. आतां केवळ आपणांसर्वांच्या संतोषास्त-वच हें मी औषध घेत आहें. आतां आमचें जान्हवीतीर्थ हेंच खरें औषध आणि श्रीभगवान्नारायण हाच आमचा वैद्य " "आईसाहेब, आजपर्यंत आह्मीं आपल्या सर्व दौ-लतीचा कारभार केला, तो यापुढें धनी श्रीमंत आबासाहेब ( शिवाजीमहाराज ) ह्यांनीं आमचेप्रमाणेंच पहावा आणि जामदारखान्याच्या ह्या किल्ल्याही संभाळाव्या. आतां आबासाहेब यांचें बुद्धिवैचित्र्य अनुपम असून स्वबुद्धिनें चालण्यासारखें यांचें वयही झालें आहे. ह्यांच्या सर्व गुण-लक्षणकर्तृत्वांवरून हे मोठे भाग्यशाली निपजून स्वपराक्र-मानें जगद्विख्यात होतील असें अनुमान दिसत आहे. आतां आबासाहेब हे अद्याप बालबुद्ध असल्यामुळें स्व-हिताहिताविषयीं वेळेवर विचार न राहून समयविशेषीं हे एकदम एखाद्या साहसकर्मीं प्रवृत्त होण्याचा संभव आहे, जाणून ह्यांच्या खऱ्या कल्याणाच्या ज्या चार गोष्टी प्रस्तुत मी ह्यांस सांगणार आहे, त्या लक्षपूर्वक ऐकून घे-ऊन त्याप्रमाणें हे वागत गेले असतां ह्यांचें परमेश्वर निरंतर कल्याण करून सर्व मनोरथ पूर्ण करील." असें

बोलून दादांनीं शिवरायाचा हात आपल्या हातांत धरून प्रेमपूर्वक त्याचें चुंबन घेऊन कंठसद्गदित होत्साता ते शिवरायास ह्मणतात.

श्लोक.

पडुनि भीष्म जसा शरपंजरीं ।
कथितसे नृपनीति[1] युधिष्ठिरीं[2] ॥
खिळुनि भूमिस दादुजि त्यापरी ।
करि शिवाजिस बोध परोपरी ॥ १ ॥

## दादोजीचा हितोपदेश.

श्लोक.

कोणी बाळा शिवाजी तुजहुनि दुसरा ना मला आवडीचा ।
आतां भूलोकिचा मी परितव उरलों सोबती दो घडींचा ॥
बा त्वत्कल्याण व्हावें चिर असुनि सुखी, एवढी आस पोटीं ।
एतस्मात् शेवटीं मी तवहितकरशा सांगतों चार गोष्टी ॥ १ ॥

(पद. वैशाखमास—या चालीवर.)

शिवबाळा शेवटचें सांगणें तुला।
त्वद्धित तें करुनि करिल पूर्ण हेतुला ॥ धृ. ॥
"निजशौर्यें विध्वंसुनि यावनीं[3] पुरी ॥

१ राजनीति. २ धर्मराजास. ३ मुसलमानी राजसत्ता.

स्वसाम्राज्य संस्थापुनि भारतीवरी ॥
हिंदुबंधुलागीं देउं सुख परोपरी" ॥
कामनाहि निश्चयता ही तुझी खरी ॥
परि न तशी वेळ आज जाण अंतरीं ॥
घेउनि वृकिं धांव, जय न मिळे मेंढिला ॥१॥
शिवबाळा शेवटचें सांगणें तुला ॥ धृ.॥२॥

## श्लोक.

तुझी ह्या वचें मोडितों मी उमेद ।
असें मात्र ना जाण, ना मान खेद ॥
तुझी सर्व तेजस्विता जाणतों मी ।
परी ती न येईल बा आज कामीं ॥ ३ ॥
खिळे दादुजी अंथरूणीं विचारा ।
तुझ्या तूंच पाहीं करुनी विचारा ॥
अविधीं पुरी वेष्टिली बा धरा ही ।
न कोठेंच आतां तयां बाध राही ॥ ४ ॥

## पद.

सुरवणी ( वैशाख मास० या चालीवर. )

काशीपासूनि रामनाथतोंवर ॥
यवनबादशाहि माजली अनावर ॥

---

१ भरतखंडावर. २ लांडग्यावर ३ पृथ्वी. ४ रामेश्वरपर्यंत.

एकसहा जबर हुकुम चौंदिशांवर ॥
यवनशिरीं ढळुनि नित्य छत्रचामरं ॥
जाहलेच तत्पदनत हिंदु पामर ॥
केंवि लंघशील यवनसैन्यसिंधुला ॥ २ ॥
शिवबाळा शेवटचें सांगणें तुला ॥ धृ० ॥५॥

श्लोक.

" अगे ये कळी बैस माझ्या नळींच " ।
करूं तूं नको कृत्य ऐसें मुळींच ॥
शहासर्पपुच्छीं बळें पाय देतां ।
न मारील कां डंख तो प्राणहर्ता? ॥ ६ ॥
अरिष्टीं अशा तूं पडूनी फुकाच ।
नको आइच्या लावुं जीवास कांच ॥
पहा पोळली[1] एकदां ती अधींच ।
अतां तूं तरी ऐस बाळा सुखांच ॥ ७ ॥
पित्याला तुझ्या देणगी तत्कृपेची ।
तर्यो मात्र तो भूप आणील पेंचीं ॥
तुझ्या वर्तनें त्यास लावील कैची ।
तुझी थोरवी सांग राहील कैची? ॥ ८ ॥

पद. पुरवणी ( वैशाख मास० या चालीवर. )

यवन निपट दैत्य महाक्रूर निर्दय ॥

---

१ ज्येष्ठपुत्र संभाजीच्या मरणदुःखानें विव्हळली.

स्वसांम्राज्य संस्थापुनि भारतीवरी ॥
हिंदुबंधुलागिं देउं सुख परोपरी" ॥
कामनाहि निश्चयता ही तुझी खरी ॥
परि न तशी वेळ आज जाण अंतरीं ॥
घेउनि वृकिं धांव, जय न मिळे मंदिला॥१॥
शिवबाळा शेवटचें सांगणें तुला ॥ धृ.॥२॥

## श्लोक.

तुझी ह्या वचें मोडितों मी उमेद ।
असें मात्र ना जाण, ना मान खेद ॥
तुझी सर्व तेजस्विता जाणतों मी ।
परी ती न येईल बा आज कामीं ॥ ३ ॥
खिळे दादुजी अंथरूणीं बिचारा ।
तुझ्या तूंच पाहीं करुनी विचारा ॥
अविधीं पुरी वेष्टिली बा धरा ही ।
न कोठेंच आतां तयां बाध राही ॥ ४ ॥

## पद.

पुरवणी ( वैशाख मास० या चालीवर. )

काशीपासूनि रामनाथतोंवर ॥
यवनबादशाहि माजली अनावर ॥

---

१ भरतखंडावर. २ लांडग्यावर ३ पृथ्वी. ४ रामेश्वरापर्यंत.

एकसहा जबर हुकुम चौंदिशांवर ॥
यवनशिरीं ढळुनि नित्य छत्रचामर ॥
जाहलेच तत्पदनत हिंदु पामर ॥
कवि लंघशील यवनसैन्यसिंधुला ॥ २ ॥
शिवबाळा शेवटचें सांगणें तुला ॥ धृ० ॥५॥

श्लोक.

" अगे ये कळी बैस माझ्या नळींच " ।
करूं तूं नको कृत्य ऐसें मुळींच ॥
शहासर्पपुच्छीं बळें पाय देतां ।
न मारील कां डंख तो प्राणहर्ता? ॥ ६ ॥
अरिष्टीं अशा तूं पडूनी फुकाच ।
नको आइच्या लावुं जीवास कांच ॥
पहा पोळली एकदां ती अधींच[1] ।
अतां तूं तरी ऐस बाळा सुखींच ॥ ७ ॥
पित्याला तुझ्या देणगी तत्कृपेची ।
तर्यी मात्र तो भूप आणील पेंचीं ॥
तुझ्या वर्तनें त्यास लावील कैची ।
तुझी थोरवी सांग राहील कैची? ॥ ८ ॥

पद. पुरवणी ( वैशाख मास० या चालीवर. )

यवन निपट दैत्य महाक्रूर निर्दय ॥

१ ज्येष्ठपुत्र संभाजीच्या मरणदुःखानें विव्हळली.

मत्तपणें धर्मनीति सोडुनी नय ॥
अनुचित कर्मं करूनि वसति निर्भय ॥
जे स्वप्नीं जाणती न कींव कीं गय ।
मिळवुं इच्छिशीच त्यांजपासुनी जय ॥
टिटविकडुनि जाय कसा सिंधु आटला?॥ २ ॥
शिवबाळा शेवटचें सांगणें तुला ॥ धृ० ॥९॥

## आर्या.

त्वां डाव धी१बळाचा मांडियला परि न निजबळा बघसी ॥
मग शह शहास देउनि वद प्यादीमात साधिशील कशी? १०
पूर्ण मनन करुनि अर्थी, बळजोरें उपरि खेळनां डाव ॥
होशील नित्य विजयी प्रतिपक्षाचा करूनि पाडाव ॥ ११ ॥

## छंद.

पाठिंबा बघतां दिसे तुज न कंचाही ।
वाटते तुझी शिवबाळा मज चिंता ही ॥ धृ० ॥
नावडता झालास बा तुझ्या तूं ताता ।
तत्साह्य मिळावें तरि मग कोठुनि आतां ? ॥
धांवेल तुझ्या मदतिला धरूनि अहंता ।
नच काका मामा असा मावसा भ्राता ॥
मेहुणा सासरा नान्यहि आश्रयदाता ।
ना दुजा आसरा दिसे तुला जो त्राता ॥

---

१ बुद्धिबळाचा.

सत्याश्रयदात्री मात्र तुज अनंतो ही ।
वाटते तुझी शिवबाळा मज चिंता ही १ ॥
इर्षेत तुज न राहतां प्रसंगीं भान ।
दाविता बोधिता तुला कोणि उरला न ॥
माय ही किंवेची तुझी जरिहि सज्ञान ।
जाईल दबुनि तरि तुझें बघुनि अवसान ॥
उरणार इतःपर तुला मीहि कथिता न ।
चिर सुखी सयश तुज राखो श्रीभगवान ॥
ना ढळे प्रेम ठेपला जरि निहंतोही ।
वाटते तुझी शिवबाळा मज चिंताही ॥ २॥ १२॥

## श्लोक.

अर्धी साहसी धाडसी तूं मनस्वी ।
तशांतून होणार आतां मनस्वी ॥
स्वतंत्रत्व, तारुण्य, सम्पत्ति, सत्ता ।
न ह्या चार गोष्टी बऱ्या, एक होतां ॥ १३ ॥
स्वतंत्रत्व वा आगमीं सौख्यकारी ।
तरी निर्गमीं होय तें हानिकारी ॥
ढिलीं पाडुनीं मूळचीं बंधनें, ते[४] ।
अमर्यादमार्गास ओढूनि नेतें ॥ १४ ॥
तरी वागतां यापुढें तूं स्वतंत्रें ।

१ पृथ्वि. २ यम. ३ स्वतंत्र. ४ स्वातंत्र्य.

सुमर्याद मोडूनि जातील तंत्रें ॥
निदानीं तुझा खेद होईल चित्तीं ।
मनीं माझिया वाटते हीच भीती ॥ १५ ॥

### दिंडी.

दाव[1] माझा कांहिंसा तुला होता ।
परी जाणार क्षणीं तोहि आतां ॥
जरी मातेच्या वर्तसी विचारीं ।
परी सतत न ती तुजसवें विचारी ॥ १६ ॥

### अभंग.

अझूनी शिवोबा तुझी बाळबुद्धि । देईल ती शुद्धि मागली न ॥ ह्मणूनी बा तुझे खरेजे हितेच्छु । त्यांस होई पृच्छु हरकार्यी॥त्वन्मित्र, सेनानी, दुजे अधिकारी। नेकीचे, विचारी, दूरदर्शी ॥ नित्य तूं वागतां तयांच्या विचारीं । लाभतील चारी अर्थ[2] तूतें ॥ १७ ॥

### श्लोक.

पहा या मुसलमानलोकांकडे रे ।
तिहीं स्वर्णभूमींत ठोकूनि डेरे ॥
स्वशक्तया हरूनी धना रोकडे रे ।
अह्मां हिंदुंना मानिती माकडें रे ॥ १८ ॥

---

१ दाब. २ पुरुषार्थ.

मिळे हिंदुंशीं धर्मना जात कांहीं ।
न आचार भाषा लिपी व्युत्क्रमाही ॥
नद्यांपारचे ब्रह्मपुत्राहि सिंधु ।
न कोण्यापरी म्लेंच्छ हे देशबंधू ॥ १९ ॥
मुळीं म्लेंच्छहिंदूंत कांहीं न खिस्सा ।
नसूनी, तसा कोणता हक्क हिस्सा ॥
करूनी तरी हिंदुंचा फार घुस्सा ।
बळें पाहती द्यावया त्यांस दुस्सा ॥ २० ॥

## फटका.

म्लेंच्छलोक हे परदेशांतुनि येतां ह्या हिंदुस्थानीं ।
काय काय जें घडूनि आलें आण शिवोबा तें ध्यानीं ॥धृ०
शेंड्या जाऊनि जिकडेतिकडे बहु झाल्या दाढ्या प्रमदा ।
घरोघरीं त्या घुसल्या सुंता बैसुनि मुंजीवरी गदा ।
संध्या झाल्या वंध्या अक्षय मुक्ति मिळे चारी वेदां ।
पुराण जाउनि कुराण आलें, निमाज चढले बहु नादा ॥
देवमंदिरें तमाम घालिति दंडप्रणिपात भूपदा ।
घुमट मनोरे शोभुं लागले चहूंकडे दर्गे मशिदा ॥
रामकृष्ण नारायण शिवहर हा ध्वनिं कानीं नये कदां ।
जिकडे तिकडे बहुत दणाणे याअल्ला यारहिम खुदा ॥
प्रदोष एकादशी चतुर्थी यांचा होउनि बहु चेंदा ।

---

१ ढलटी.

रोजांचा सुळसुळाट होउनि पावलेच ताबुत मोदा[1] ॥

चाल.—काशीला लागुनी धुक्का ।

बोकाळे सारी भक्का ॥

पसरे चहूंकडे निक्का ॥

'धन्या बाफळ्या, चोरा मलिदा' ऐशीगत होय निदानीं ।
गुलामबंदे हिंदु जहाले; धर्माला आली ग्लानी ॥ ११ ॥

श्लोक.

शिखानष्टतुल्य क्रियानष्ट लोक ॥
न म्या पाहिले, तूंहि चित्तिं विलोक ॥
पहा म्लेंच्छ जो तो स्वयें शाल ल्याला ।
पुरी धोंगडी ना मिळे आपल्याला ॥ १२ ॥

धनी जेवुनी पंचपक्वान्नताटीं ।
पहा श्वान जैसा तदुच्छिष्ट चाटी ॥
तसे हिंदु हे, म्लेंच्छ जे माजरेच ।
जहालेच तत्पात्रिचीं मांजरेंच ॥ १३ ॥

महाघातकी पातकी म्लेंच्छमत्ता ।
पहा आपले हाल खाई न कुत्ता ॥
तयांचाच तूं नित्य घेऊनि कित्ता ।
हिरावून घे आपली राजसत्ता ॥ १४ ॥

---

१ आनंदाप्रत.

### दिंड्या.

मात्र बाईच्या त्यजुनि सर्व गोष्टी ।
बऱ्यावाईटीं पोंचवूनि दृष्टि ॥
स्वतां झेंपेलचि, पाय अशा कामीं ।
टाक शिवबाळा सांगतों तुला मी ॥ २५ ॥
जगीं केवळ जाणूनि माय देवी ।
भृंग होउनि तत्पद्मांबुजां सेवीं ॥
तिच्या स्वस्तिवचें नित्य पाय टाकीं ।
सदां होशिल तूं यशस्वीच लोकीं ॥ २६ ॥

### साक्या.

टाकियला जो पाय पुढें, तो न कदां घेतां मागें ॥
कार्यसिद्धिला प्रवृत्त होईं हरयुक्तीच्या लागें ॥ २७ ॥
सामदामभेददंडयांहीं ठेवुनि बहुत हुषारी ॥
यवनाधिपतिस जेरिस आणुनि कार्य साधीं सारीं ॥ २८ ॥

### आर्या.

शिवबाळा स्वपित्याच्या होतां अणु भय न ठावकें कसा ॥
युक्तिप्रयुक्तिनें तूं साधुनि घे सर्व डाव कैकसा ॥ २९ ॥
तातनयनिचा पडतां एकहि दुःखाश्रुचा गरम बिंदू ॥

१ कल्याणप्रदवचनानें. २ श्रीरामाता कैकयीसारखा.

तो आटवील सगळा क्षणीं तुझा कामनापरमसिंधु ॥ ३० ॥

### श्लोक.

कुलस्वामिनी श्रीभवानीतुळाई ।
तिच्या ठेवुनी एकनिष्ठाच पायीं ॥
मनीं ध्याउनी नित्य तत्स्तोत्र गाई ।
यशस्वीच होशील तूं ठायिठायीं ॥ ३१ ॥

**पद.**–( बाईल पैशाची या चालीवर. )

तरि मग कां उशिर ? । कां उशिर? । घे हातीं समशेर॥ध्रु.
तुझे मावळेलोक । जाया युद्धा सिद्ध विलोक ॥ १ ॥ तरि मग०
त्रित्वन्मित्र[1] इभारी[2] । प्रभुबाजीहिसहस्त्रां[3] भारी॥ २॥तरि मग०
तव सेनानी सारे । शूरहि समरधुरंधर बा रे ॥ ३॥तरि मग०॥
सुंदरहय जवगामी[4] । खिंकाळति जाया संग्रामीं॥ ४॥तरि मग०
दारूगोळा अस्त्रें । जय्यत सर्व हत्यारें शस्त्रें ॥ ५ ॥ तरि मग०
करिती सर्व तयारी । खात्याखात्यांचे अधिकारी॥ ६॥ तरि मग
यवनगर्व उतराया । शिवावतारचि तूं शिवराया॥ ७॥तरि मग.

### श्लोक.

शिवोचा तुझा तूंच झालास कर्ता ।
तुला सांगता पाहिजे कोण आतां ? ॥
परंतू पहा फार वेडीच माया ।

---

१ तुझे तिघ मित्र ( कंक, मालुसरे व फसलकर ) २ सिंह. ३ बाजी परभू ४ वेगवान.

मला अंतकाळींहि लावीभ्रमाया ॥ ३३ ॥
क्षणीं लोक जाणार हा मीं त्यजून ।
तरी प्रेम कांहीं उणें हो तुझें न ॥
शिवाजी तुझें नित्य कल्याण व्हाया ।
पुन्हा सांगतों, तें न तूं मान वाया ॥ ३४ ॥

## ओंव्या.

इमानी ठेवूनि गुप्त हेरें[1] । चहूं धामींचे वृत्त हेरें[2] ।
सावध राहूनि तदनुसार । शत्रु कमजोर करावा ॥ ३५ ॥
अकस्मात् गांठूनि ठायिं ठायीं । शत्रूंस आणून हातघाई ।
सामदामादि चारी उपायीं । जिंकूनि पायीं लावावें ॥३६॥
करुनी हमेशा गुप्त पहाणी । सैन्यांत आढळतां फितुरी कोणी
तूं होऊनि दंडपाणी[3] । त्यांस तत्क्षणीं दंडीजे ॥ ३७ ॥
जयांची खरी राजनिष्ठा । वेळोवेळीं तत्प्रतिष्ठा ।
वाढवोनी, त्यांस पदश्रेष्ठा । पोंचवूनी सुखी ठेवावें ॥ ३८ ॥
युद्धीं वीर कामीस येतां । तत्कुटुंबपोषणीं तत्वता ।
तूंच होऊनी आश्रयदाता । त्यांस सर्वथा सांभाळीं ॥ ३९ ॥
अशानें सर्वसैन्य वीरजन । प्रसंगीं पाहतां जीवाकडे न ।
शौर्यें समशेर गाजवून । विजयी कां न होतील ? ॥ ४० ॥

---

१ बातमीदार. २ पहा जाणून घे. ३ यम. मेला असतां.

**पद.**—(एडका मदन० या चालीवर.)

ऐक शिवराया । धन्य तो पुरुष महिवर या ॥ ध्रु० ॥
जाणें[1] एकदिनि अकस्मात् ॥
जन जो कोणी एतस्मात् ॥
उरवी सुकीर्ति निजपश्चात् ॥
तरि परोपकारीं संतत । झीजवी काया ॥ १ ॥ धन्यतो०
करावें ऐसें कांहीं काम ॥
होइल तें सर्वा सुखधाम ॥
गाउनि अखंड यद्गुणनाम ॥
जन उत्सुक होतिल तदुत्सवास कराया ॥२॥ धन्यतो० ॥
उरे जो यशरूपें पश्चात् ॥
पुरुष तो जीवंतचि साक्षात् ॥
ऐसें वदती श्रुति धादांत ॥
जाणुनी मनीं हें, वय न घालवी वाया ॥ ३ ॥ धन्यतो०
करणें ऐसी कांहीं करणी ॥
चटका लागुनि अंतःकरणीं ॥
जग हें तळमळेल यन्मरणीं ॥
कथि के.स.रि. सद्गुरू तोच । भवाब्धितराया ॥ ४ ॥ धन्यतो०

---

१ जिजाबाईला.

## दिंडी.

वीरकन्या जी आणि वीरकांता ।
जनीं म्हटली आजवरि, तिला[1] आतां ॥
आत्मशौर्यें बोलवीं वीरमाता ।
तरिच सार्थकता तुवां जन्म घेतां ॥ ४२ ॥

---

१ जिजाबाईला.

समाप्त.

## श्रीशिवछत्रपतिमहाराजांची आर्ती.

( आर्ती भुवनसुंदराची० या चालीवर. )

नृपश्रीछत्रपति शिवाजी । ओंवाळितों तुला आजीं ॥धृ०॥
भारती[1] अविधमय झाली । ग्लानि हिंदुधर्मास आली ॥
घरोघर महंमदी घुसली । पुराणें, शास्त्रें स्थिर बसलीं ॥
हिंदुंचा कोणि नुरुनी वाली । मोडल्या सर्व रूढि चाली ॥

चाल.

लोपलीं वर्णाश्रमकर्मे । जातिचा भेद । नुरुनि, बहुखेद पावले वेद । असें जाणून होशि अवतीर्ण । शिसोदेंक्षात्रकुळामाजीं । ओंवाळितों तुला आजीं॥१॥नृपश्रीछत्रपति.धृ.
परिसुनी भारतभागवता । पावली वीरश्री स्फुरता ॥
जरिहि आंगांत रुळे शिशुता । वळे चित्तवृत्ति देशहिता॥
मिळवुनी वीरमेळ भवतां । उभा ठाकशी रणीं सवता ॥

चाल.

वयाच्या सोळाव्या वर्षी । बघुनि घोरणा । जाउनी रणा । दुर्गतोरणा । अकस्मित चढुन । घेतला लढुन । नांव तूं गाजविलें गाजी । ओंवाळितों तुला आजीं० ॥ २ ॥
करुनिया दुर्जनसंहार । भूमिचा उतराया भार ॥
सुजनहृत्ताप करुनि दूर । कराया जनपद[2]संसार ॥

---

१ भरतखंड. २ देशप्रपंच.

धर्मसंस्थापनार्थ थोर । तुझा शिवराया अवतार ॥

चाल.

भोंसलेवंशनरवरेंद्रा । बघुनि तव वीर्य । पराक्रम, शौर्य । खचुनि निजधैर्य । यवन रिपु मस्त । जोडुनी हस्त । करिति तुजपुढें ह्यांजिह्यांजी । ओंवाळितों तुला आर्जी० ॥
॥ ३ ॥ नृपश्री० ॥

विजापुरपतिही दिल्लिपती । कराया घात तुझा टपती ॥
कितिक संकटें तुझ्यावरतीं । आणितां, ढळवुनि ना स्वधृति ॥
ठकांना महाठक न ठकती । तशी त्वां प्रकटविली स्वकृति ॥

चाल.

तयांच्या कपटरूप डावा । जाणुनी मनीं बहुत युक्तिनीं नाकिं दाबुनी । उभयरिपुंवरी । अखेरिस पुरी । दिली विनतें नरद्वाजी । ओंवाळितों तुला आर्जी०॥ध्रु०॥४॥
सुसंस्थापुनी स्वराज्य नवें । ठेविले लोक सुखी अववे ॥
विप्रगोपालक ह्या नांवें । जगीं ह्मणविलास स्वभावें ॥
भजुनि गुरुरामदास भावें । उकलिलें इहपरार्थगोवें ॥

चाल.

त्यजुनि तनु, कीर्तिमूर्तिरूपें । अमर होउनी । वससि तूं मनीं । तुझ्या सद्गुणीं । होउनी गुंग । केसरीभृंग । घालितो रुंजि तवपादाब्जीं । ओंवाळितों तुला आर्जी ॥
॥ ५ ॥ नृपश्री० ॥ ध्रु० ॥

# श्रीशिवरायस्तोत्र.

## भूपाळी.

भन:शामसुंदरा० या चालीवर.

धन्य धन्य धन्य श्रीमच्छिवरायनरेंद्रोत्तमा ।
तुझिया गुणमतिगतिकृतिरतिधृतिपराक्रमां नोपमा ॥ धृ०
निजाखिलार्यावर्तदेश हा यवनांनीं व्यापिला ।
न उरे हिंदूंस अल्प कोठें ठाव ह्मणुनि आपला ॥
बादशहांकित तात तुझा तो, तुझ्या सकल हेतुला ।
आड येउनी, होय वांकडा; समय असा बेतला ॥
आप्त सोयरा दुजा न कोणी पाठिंबा तुज भला ।
त्वत्साहसकृति पाहुनि, तुजवर जरिहि शहा क्षोभला ॥
स्वबळें तोडावया हिंदुंची परवशताशृंखला ।
दंड ठोकुनी उभा ठाकशी रणांगणीं एकला ॥

### चाल.

विविध संकटारिष्टें । ठेपतां तूं न डगशी ॥
सैन्यांत खबरदारी । राखिली व्यवस्थितशी ॥
तरवार गाजवूनी । जिंकिले आत्मरिपुंशीं ।
खपशी देशार्थ, सोसुनि तृषाक्षुज्जलदोष्णां हिमा ।
तुझिया गुणमतिगतिकृतिरतिधृतिपराक्रमां नोपमा ॥ १ ॥
त्वत्प्रतापभास्करप्रकाश क्षितिजावर फांकला ।
तोंच रिपुम्लेंच्छभमण निस्तेजत्व सहज पावला ॥

बहुनि तुझ्या शौर्यधैर्यनिश्चयपराक्रमां निस्तुला ।
व्हाया स्वतरण, धरुनि चरण,रिपु येती शरणचि तुला॥
पंचत्रिंशतिवर्षें स्वक्रम न पडूं देतां ढिला ।
स्वराज्य संस्थापुनि, तोषविलें भरतखंडभूमिला ॥
विप्रक्षात्रियवणिक्शूद्रचत्वारिवर्णजातिला ।
यत्तत्धर्मी वर्तवुनि सदां सुखतोष जनां दिला ॥

चाल.

ठेविली राजकार्यीं । दक्षता स्वलक्षपणें ॥
भूपति प्रजाप्रिय तूं । झाळास आत्मसुगुणें ॥
उजळिल्या दिशा दाही । सत्कीर्तिभानुकिरणें ॥
झटशी द्याया सुख प्रजेला निवारुनी तच्छ्रमा ॥
तुझिया गुणमतिगतिकृतिरतिधृतिपराक्रमां नोपमा ॥२॥
परांगना मानिली स्वकन्या, बहिण, माय, मावशी ।
व्रतंकरुनि ह्या, श्रीरामप्रभु कां न ह्मणावें तुशीं? ॥
स्वशौर्यतेजें जामदग्न्यसा रिपुगणास भासशी ।
सुजनांच्या हृत्ताप हराया होशी सौख्यद शशी ॥
उदारता प्रत्ययास आली तुझी अंगराजशी ।
अढळ तुझी निश्चयता केवळ गाधिसूनुसादृशीं ॥
भाव एकविध ठेउनि श्रीरामदासगुरुपदीं ।
इहपरार्थ साधुनी ह्मणविली धन्य आइची कुशी ॥

चाल.

इरकार्य तुवां केलें । स्मरुनी श्रीभगवंता ॥

मीपणा त्यजुनि अवघा । वंदिलें साधुसंता ॥
देउनी द्विजां तुष्टी । रक्षिली धेनुमाता ॥
राजधनाश्रय देउनि गरिबां गुंतविलें उद्यमा ॥
तुझिया गुणमतिगतिकृतिरतिधृतिपराक्रमां नोपमा ॥३॥
त्वद्गुणलीला गातां कोणी, कलुषित मन तुजविशीं ।
करुनि, कितिक निंदितात तुजला नवलाई कायशी ? ॥
ज्यांस नुमगली इतिहासांतिल इंग्रेजी मकलशी ।
तेच मात्र जडमतिजन करुनी द्वेष निंदिती तुशीं ॥
निंदेविण वाईटबऱ्याची पारख होते कशी ? ।
शतताप दिल्याहि होय न उणें सोनें बावनकशी ॥
सारमेय भुंकतां न येइल लघुता लवु दंतिशी ।
सूर्यावर थुंकतां मूढजन पावे निज फजितिशी ॥

चाल.

त्वत्तपःपुण्यतेजें । आमुची हिंदुताही ॥
राहिली आजवरिबा । संदेह यांत नाहीं ॥
उतराइ अल्पव्हाया । रंगलों त्वदुत्साहीं ॥
त्वद्यशगानीं, रंगुनि केसरि पावतसे विश्रमा ।
तुझिया गुणमतिगतिकृतिरतिधृतिपराक्रमां नोपमा ॥४॥
धन्य धन्य धन्य श्रीमच्छिव० ॥ धृ० ॥

# भाग १ ला समाप्त.